
मधुराद्वैताचार्य ज्ञानेशकन्या बालांध संत श्रीगुलाबरावमहाराज
यांच्या ग्रंथातील विषयांचा अकारादि वर्णक्रमानुसार संदर्भ-निर्देश-सूचिरूप

# माधुर्यमधुकोष

॥ गुरु शिरोमणी पांडुरंगनाथ । त्यांचे पायीं चित्त जन्मोजन्मीं ॥





**॥ कोषनिर्माते ॥**

श्रीगुलाबरावमहाराजांच्या शिष्यपंचायतनातील

**पूज्य कै. भाऊसाहेबजी अर्थात् दत्तात्रेय गणपतराव खापरे**

महाल, नागपूर.


*


॥ प्रकाशक ॥

श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ

दहिसाथ, अमरावती, विदर्भ. दूरभाष : ०७२१.२६७६३०७

**श्रीकात्यायनी शताब्दी महोत्सव प्रकाशन**

**सर्व हक्क :**
**श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ,**
दहिसाथ, अमरावती, विदर्भ.
दूभाष ७२१.२६७६३०७

**मुद्रण :**
श्री. हरिभाऊ गोखले
ऋचा ग्राफिक्स, सावरकर चौक,
खामला मार्ग, नागपूर.

---

**श्रीमहाराजांचे सर्व ग्रंथ मिळण्याची स्थाने**

---

**१. ज्ञानेश्वर संस्थान**
प्राचार्य डॉ, अ.स.जोशी,
पाताळेश्वर मार्ग, महाल,
नागपूर.४४०००२.
टेली. ७१२-२७२०२७८

**२. श्री. मु. द. खापरे**
ज्ञानेशकृपा, प्लॉट-२५,
तात्या टोपे नगर नागपुर

**३. श्री. हरि यादव खापरे**
१००, विवेकानंद नगर,
नागपूर४४००१५.
टेली.२२२५७८५

**४. सुधाकर फणसळकर**
तिसरा माळा,'सिद्धान्त'अपार्टमेंट,
सुयोग मंगल कार्यालयाजवळ,
शनिवारपेठ पुणे ३०.
टे- ०२०-२४४८०६४५

**४. श्रीरंग घटाटे**
गोकुळ, घटाटे ले-आउट, प्लॉट ९,
सिव्हिल लाईन्स,नागपूर.४४०००१.
टेली. ०७१२ - २५२९७७०
०७१२ - २५३३९९७

* **प्रथम संकरण :** प्रति ६००
* **कलियुगवर्ष** : ५१०४
* **इसवी सन :** २००३

**रु.३००/-**

### *कोष कसा पहावा ?*

* विषय आणि त्यासमोर महाराजांच्या समग्र ग्रंथावलीच्या प्रथम आवृत्तीच्या यष्टीचा क्रमांक कंसात टाकून, त्याला जोडूनच पानाचा क्रमांक टाकला आहे. नंतर ग्रंथनांव - अध्याय - ओवीक्रमांक आहे. (यष्टि = खंड)

**विषय / (यष्टि)-पान / ग्रंथनाम / अध्याय / ओवी**
**विषय / (२पू.)१४ / प्रेमनिकुंज / अ.१ / ओ.४३**

# अनुक्रम

**आभार** डॉ. माधव द. खापरे
**प्रस्तावना** डॉ. वा. ना. पंडित
**मधुराद्वैत दर्शन** श्री बाबाजीमहाराज पंडित
**ती. काकाजींचे सेवेशी** मुरलीधर द. खापरे
**परिस-स्पर्श**
**श्रीगुलाबरावमहाराजांच्या जीवनाचा आलेख**
**कार्याचा आलेख**
**विषयानुसार ग्रंथसूचि**
**महत्वाच्या १७ सूचना** कै. भाऊसाहेबजीं खापरे
**मधुकोषातील अनुक्रमणिका**
**माधुर्य मधुकोष** पृ.१ ते ६१४
**यष्टीनुसार ग्रंथसूचि** ६१५
**पांडुरंगनाथ जयंति** कै. भाऊसाहेबजीं खापरे

* * * * * * * * * * * * * * * * * * * * *

⊙ **website - www.gulabraomaharaj.org**

# आभार

श्रीगुलाबरावमहाराजांच्या या एन्सायक्लोपिडियाच्या प्रकाशनासाठी ज्या महाभागांनी आपले कर्तव्य म्हणून निरपेक्षपणे कष्ट घेतले आणि हा ज्ञानकोष अभ्यासकांना उपलब्ध करून दिला त्यांना मनापासून प्रणाम !

* ती. भाऊसाहेबजींनी या कोषात आशय व्यक्त करणाऱ्या एका वाक्यात विषय आणि त्यासमोर महाराजांच्या समग्र ग्रंथावलीच्या प्रथम आवृत्तीच्या यष्टीचा क्रमांक कंसात टाकून, त्याला जोडूनच पानाचा क्रमांक टाकला आहे.

* पण पुढील आवृत्त्यांमधे पानांचे क्रमांक बदलले, त्यामुळे महाराजांचे मंडळीतील ज्येष्ठ व्यक्तिमत्व श्रीनिवासशास्त्री हरिदास यांचे नातू कै. लक्ष्मण माधव घुई उर्फ बाबूराव यांनी या संदर्भ कोषात ग्रंथाचे नांव, अध्याय आणि ओवीक्रमांक टाकण्याचे अवघड काम केले. त्याचाही या कोषात अंतर्भाव केला आहे. जसे -

विषय / (यष्टि) / पान / ग्रंथाचे नांव / अध्याय-क्रमांक / ओवीक्रमांक
विषय / (१) / १४ / भक्तिपदतीर्थामृत / अध्याय १ / ओवी ४३

याातील पहिले तीन संदर्भ पूज्य भाऊसाहेबजींचे असून नंतरचे तीन संदर्भ बाबुराव घुईंचे आहेत. या पद्धतीमुळे अभ्यासकांची फार मोठी सोय झाली आहे.

* डॉ. गुणाकर पिंपळापुरे आणि अमरावतीचे प्रा. देवराव भुजाडे यांनी वयाची सत्तरी ओलांडली असली आणि प्रकृती बरी राहत नसली तरी डोळ्यात तेल घालून सर्व कोषावरून शेवटचा हात फिरविला.

* श्री गोपाळराव आणि सौ. वसुधा आठवले यांनी कोषाची अनुक्रमणिका करून दिली.

* या ग्रंथराजाच्या आतील पानांचे गेटप श्री. हरिभाऊ गोखले यांनी मन लावून उत्तम रीतीने तयार केले.

आम्ही या सर्वांचे अत्यंत कृतज्ञ आहोत.

***- डॉ. माधव द. खापरे, वर्धा.***

*सदस्य, ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, अमरावती.*

# प्रस्तावना

- डॉ. वा. ना. पंडित

बालांध विभूती मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबराव महाराज यांच्या समग्र वाङ्मयात आलेल्या अनेक विविध विषयांच्या संदर्भाची सूची, माधुर्य मधुकोष या ग्रंथाच्या रूपाने कै. भाऊसाहेब उर्फ दत्तात्रय गणपतराव खापरे यांनी अनेकवर्षे परिश्रम करून तयार केली होती. आज 'या अमूल्य ग्रंथाला प्रकाशित करण्याचे अवघड कार्य त्यांच्या कुटुंबियांनी पूर्ण केले त्याबद्दल महाराष्ट्रातील सर्व सांप्रदायिक अनुयायांना आनंद वाटून ते ग्रंथ प्रकशकांना धन्यवाद देतील यात शंका नाही.

मागील तीस-चाळीस वर्षात श्रीमहाराजांच्या वाङ्मयाचा वाचकवर्ग बऱ्याच मोठ्या, प्रमाणात वाढत आहे. आधुनिक बुद्धिवादी म्हणविणाऱ्या विद्वानांना देखील त्यांच्या वाङ्मयाने आकर्षित केले असल्यामुळे त्यांच्या वाङ्मयाचा प्रसार केवळ सांप्रदायिकांपुरताच मर्यादित राहिलेला नाही. वारकरी संप्रदायातील तर नामवंत कीर्तनकार श्रीमहाराजांच्या वाङ्मयाचा अभ्यास करून आपल्या कीर्तनातून श्रीमाउलींच्या वाङ्मयातील उद्धारणांबरोबरच त्यांच्याही वाङ्मयातील तर्काधिष्ठित विचारसरणीचे प्रतिपादन मोठ्या आदराने करतात. श्रीमहाराजांची पारमार्थिक भूमिका सर्वधर्म व सर्व संप्रदाय यातील तत्त्वज्ञानांच्या समन्वय करण्याची असल्यामुळे सर्वांनाच त्यांच्या विषयी आदर वाटतो व त्यांना 'समन्वयमहर्षी' म्हणून गौरवण्यात आनंद वाटतो.

श्रीमहाराजांचे आराध्य देवत श्री माउली आहे व आपल्याला ते त्यांची कन्या म्हणवितात. श्री माउलीनेही त्यांना आपल्या नामाचा मंत्र देऊन अनुगृहीत केल्याचे श्रीमहाराजांनी म्हटले आहे. वारकरी संप्रदायाविषयी व त्या संप्रदायातील तुकाराम महाराज, एकनाथ महाराज, नामदेव महाराज इत्यादि सर्व संत महात्म्यांच्या वाङ्मयातील तत्त्वज्ञान श्री शंकराचार्यांचे असून त्याची परिणती 'मी ब्रह्मस्वरूप आहे' या ज्ञानाच्या जाणीवेत होतेव हे ज्ञान यथार्थ असले तरी सच्चिदानंद दृश्य विग्रहधारी सगुण भगवंताच्या परप्रीतीत ते परिणत झाल्याशिवाय अखंड ब्रह्मसम्पन्नता केवळ ज्ञानाच्या ठिकाणी गणली जावू शकत नाही; हे सर्व संत महात्म्यांच्या तत्त्वज्ञानाचे सार असल्याचे श्रीमहाराजांनी आपल्या तर्काधिष्ठित शैलीने सप्रमाण प्रतिपादन केले आहे. इतकेच नव्हे तर या ज्ञानोत्तर भक्तीच्या प्रतिपादनाला समर्थांच्या वाङ्मयाचाही आधार त्यांनी दर्शविला आहे. सर्वधर्म व संप्रदाय यांचा समन्वय हाच श्रीमहाराजांच्या मधुराद्वैत संप्रदायाचा विशेष आहे.

या मार्धुयमधुकोषाचे सूचीकार श्री भाऊसाहेब खापरे हे श्रीमहाराजांच्या शिष्य

पंचायतनातील होते यावरून त्यांची पारमार्थिक योग्यता केवढी मोठी होती हे कळून येईल. त्याकाळी नव्यन्यायात प्रकाण्डपंडित म्हणून सर गंगाधर शास्त्रींची भारतात प्रसिद्धी होती. अलाहाबादला पाश्चात्य तत्त्वज्ञानात एम.ए. करण्याकरिता गेलेल्या श्री भाऊसोहबांना भारतीय दर्शनशास्त्रांची गोडी होती व त्यामुळे त्यांनी शास्त्रीजी कडे नव्यन्यायाचे अध्ययनही केले होते. अलाहाबादला एम.ए. च्या मौखिक परीक्षेत इंग्रज परीक्षकाने त्यांना पाश्चात्य तत्त्वज्ञानावरचे प्रश्न न विचारता नव्य न्यायशास्त्रातील प्रश्न विचारण्यात बराच वेळ घालवला. यांनी न्यायशास्त्राचे अध्ययन सर गंगाधरशास्त्रींसारख्या प्रकाण्डपंडिताकडे केल्याचे त्यांच्या कानावर आले होते. व परीक्षक स्वतःही न्यायाचा अभ्यास केलेला असल्यामुळेत्यालाही आनंद झाला होता. श्री भाऊसाहेबांनी आपण पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या मौखिक परीक्षेकरता आल्याची परीक्षकाला आठवण करून देताच, त्याने मोठ्या गौरवाने आता त्याची आवश्यकता नसल्याचे सांगून त्यांचेशी हस्तांदोलन केले व हार्दिक शुभेच्छा दिल्या. अलाहबाद विश्वविद्यालयाचा निकाल लागला त्यात ते प्रथम श्रेणीत आल्याचे व त्यांना सुवर्णपदक मिळाल्याचे घोषित करण्यात आले. नंतर त्यांनी वकीलीची परीक्षा देऊन बरीच वर्षे नागपूरला वकीली केली व त्यातून नंतर ते निवृत्त झाले.

श्री महाराजांच्या संपर्कात असताना त्यांनी त्यांचा अनुग्रह घेतला. श्रीमहाराजांना श्री भाऊसाहेबांबरोबर पाश्चात्य तत्त्वज्ञानातील डार्विन स्पेन्सरादींच्या तत्त्वज्ञानांवर नेहमी चर्चा करण्यात आनंद वाटत असे. श्री भाऊसाहेबांच्या भारतीय दर्शनशास्त्रांचा न्यायदर्शनाबरोबरच दांडगा अभ्यास असल्यामुळे त्यांना श्रीमहाराज महान् विद्वान् म्हणत व त्यांच्याविषयी त्यांना फार आदर व प्रेम असे. श्रीमहाराजांच्या न्यायघटित शैलीत लिहिलेल्या दशम यष्टीतील ओव्यांवर त्यांनी दिलेल्या स्पष्टीकरणात्मक टीपा पाहिल्यानंतर श्री महाराजांचे म्हणणेकसे बरोबर होते हे वाचकाला कळून येते. असो.

श्रीमहाराजांच्या वाङ्मयातून समुद्रातील मोत्यांप्रमाणे अनेक विविध विषय आलेले आहेत त्यामुळे सर्वप्रकारच्या विशेषतः निरनिराळ्या संप्रदायातील जिज्ञासूंना, त्यांच्या वाङ्मयातून त्यांना आवडत असलेल्या विषयांविषयीचे श्रीमहाराजांचे विचार त्यांना समजून घेण्यास या मार्धुयकोषाची फार मोठी मदत मिळेल. ही सूची एकप्रकारचा ज्ञानकोशच आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

या आपल्या ग्रंथाचे कर्ते प.पू. आदरणीय कै. श्री भाऊसाहेब यांना साष्टांग प्रणिपात करून ही प्रस्तावना त्यांच्या चरणी समर्पित करतो.

*मुंबई : दिनांक २०-११-२००२*

# श्रीगुलाबरावमहाराज व मधुराद्वैत-दर्शन

*- श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी श्री बाबाजीमहाराज पंडित*

*

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

## अल्प परिचय

सच्चित्सुखविहाराय विमलज्ञानमूर्तये ।
श्रीपांडुरंगनाथाय सिद्धप्रज्ञाय ते नमः।

***श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा साक्षात्कार***

वऱ्हाडातील उमरावती जिल्ह्यात माधान नांवाचेगावी पाटलाचे कुळात श्रीगुलाबराव महाराजांचा जन्म शके १८०३ आषाढ महिन्यात झाला. पांडुरंगनाथ हे त्यांचे नाथसंप्रदायातील नांव. श्रीमहाराजांची आई थोर पतिव्रता व वडील थोर शिवभक्त होते. ते अत्यल्प वयातच- म्हणजे सुमारे नऊ महिन्याचे असतानाच त्यांचे दोन्ही डोळे आंधळे झाले. लहानपणचे श्रीमहाराजांचे खेळणे तंतोतंत श्रीकृष्णासारखे असे. लहानपणांत त्यांच्या ठिकाणी दांडगी स्मरणशक्ति व मेधाशक्ति व थोर प्रज्ञाशक्ति प्रगट झाली. बालपणी त्यांचे वागणे फार खेळकर व स्वच्छंदी असे. रात्रभर समाधि लावूनबसलेले पुष्कळ जुन्या लोकांनी त्यांना पाहिले. ''वैद्यराज आम्ही निर्गुणपुरीचे, औषध घ्याना कोणी'' हे गाणे ते लहानपणी म्हणत असत. शिक्षणाचा गंधहि नसताना ते काव्य करीत. पाठांतरहि बरेच होते. आमच्या पाश्चात्य विद्याभूषितांना चमत्काराचे वावडे असले तरी हजारो लोकांच्या अनुभवास आलेले त्यांचे अलौकिक सामर्थ्य पाहून ते आश्चर्यचकित होत.

स्वतः श्रीज्ञानेश्वर महाराजांनी महाराजांना स्वनामाचा उपदेश केला असे त्यांनी -

आपुला अनुभव असतां प्रत्यक्ष । इतरांची कायसा साक्ष ।
मज आडवे मांडिये घेऊनी । कृपाकटाक्षें । निहाळिले।।२८।।
दिधला मंत्र चतुराक्षरी । आपुली प्रतिज्ञा केली पुरी । अध्याय ४ था

आपल्या 'संप्रदाय सुरतरु'त सांगून ठेवले आहे.

पुढे आपले गांव सोडून ते निरनिराळ्या ठिकाणी हिंडून लोकांना उपदेश करू लागले व आपल्या मताला पुष्टि देण्याकरिता पूर्वाचार्यांच्या ग्रंथातून त्यांची प्रमाणार्थ वचने घेण्यासाठी ग्रंथ वाचून घेणे सुरू झाले. वाचणाऱ्या मंडळीलाहि वाचलेल्या ग्रंथातील न उलगडणारा अर्थ त्यांनीच समजावून्द्यावा. येथून पुढे ग्रंथलेखन सुरू झाले. प्रथमपासून शेवटपर्यंतचे एकूण एक त्यांचे लिखाण लिहिलेगेले असतेतर, गद्य सोडून आज जवळजवळ सव्वा लाख पद्य लिखाण झाले असते! कांही मंडळी मग त्यांच्या जवळ राहू लागली. तोंडओळखीचे पुष्कळ लोक होते पण फार थोड्यांना त्यांनी अनुयायी म्हटले. कारण शिष्यशाखा वाढविण्याकडे त्यांचा ओढ़ नव्हता.

अशा सुप्रसिद्ध महात्म्यांनी मधुराद्वैताचे उद्घाटन केले. आपल्या ध्येयानुसार त्यांनी स्त्री-वेशाची कांही चिन्हे धारण केली होती.

### *संप्रदायाची पार्श्वभूमि*

श्रीशंकराचार्यांच्या पुष्कळशा ग्रंथातून व त्यांच्या संन्यासमार्गी अनुयायांच्या ग्रंथातून निर्गुणाचेच विशेष प्रामुख्याने वर्णन आले असल्यामुळे भक्तिमार्गाचे आंलबन जे सगुण रामकृष्णादि परब्रह्म त्याच्या स्वरूपाविषयी बरेच अपसमज वेदान्ताभ्यासू लोकात उत्पन्न झाले. त्याचे परिणाम शुद्ध भक्तिमार्गानुसारी वारकरी संप्रदायावरहि होऊ लागले.

### *भक्तिमार्गाला पोखरणी*

ज्ञानदेवी किंवा नाथभागवतासारखे ग्रंथ त्यांना वेदान्ताभ्यासाकरिता अपूर्ण वाटू लागले व निश्चलदासासारख्या निर्गुणवाद्यांचे ग्रंथ वाचून 'सगुणापेक्षा निर्गुण श्रेष्ठ' अशी वेदान्तबाह्य कल्पना त्या पंथात रूढ होऊ लागली व त्यामुळे खऱ्या भक्तिमार्गाला पोखरणी सुरू झाली.

''भक्तिमार्ग हा अज्ञान्यांचा मार्ग. निर्गुणाच्या प्राप्तीकरिता लागणारी एकाग्रता भक्तिमार्गाने प्राप्त करून घेण्याकरिता भक्तिमार्ग संतांनी प्रगट केला. वास्तविक पाहता सगुणापेक्षा निर्गुण श्रेष्ठ असून त्याच्या प्राप्तीकरिता सगुणाची भक्ति सांगितली आहे. ज्ञानानंतर सगुणाची भक्ति राहत नाही. कारण ज्ञानाने सर्व सगुणरूप मिथ्या ठरल्यावर सगुणभक्ति होऊ शकत नाही व त्यावर प्रेमबसूं शकत नाही'' इत्यादि अपसमज रूढ होऊ लागले.

श्रीमहाराजांनी आचार्यांनी मान्य केलेल्या प्रस्थानत्रयीच्या सिद्धान्तावरूनच हे वरील अपसमज कसे वेदान्तविरुद्ध आहेत हे दाखवून सगुण स्वरूपहि कसेनिरुपाधिक आहे व त्याचे ठिकाणी ज्ञानानंतरहि भक्ति करणे अंतिम साध्याच्या दृष्टीने कसे आवश्यक आहे हे अनेक ग्रंथ लिहून सप्रमाण सिद्ध केले आहे. हेच श्री महाराजांचे मुख्य अवतारकार्यहोय.

ब्रह्मज्ञान होण्यापूर्वी ब्रह्मज्ञान होण्याकरिता व ब्रह्मज्ञानानंतर जीवन्तपणीच जीवन्मुक्ति व विदेहमुक्तीचे सुख भोगण्याकरिता ज्ञानोत्तर रामकृष्णादि सगुण साकाराची भक्ति अवश्य केली पाहिजे, हे सर्व त्यांच्या ग्रंथांचे सार आहे.

''निर्गुणवादाने रामकृष्णादिकांचे देह मायिक म्हणजे भौतिक ठरल्यावर त्या पांचभौतिक देहाचे ठिकाणी ज्ञानानंतर प्रेम राहणे शक्य नाही. सगुण भगवंताचे ठिकाणी आत्मप्रेमवत् प्रेम असणे याला भक्ति म्हणतात. प्रेमच नाही तर भक्ति तरी कुठली? व अशा विचारसरणीने भक्तिमार्गतरी कसा टिकणार? आत्मज्ञान होण्यापूर्वी जो आत्मानात्मविचार करावा लागतो त्याच वेळी पांचभौतिक अशा अनात्मविषयांचे प्रेम नाहीसे होते. तसेंच भगवंताचा देहहि पांच भौतिकच असेल तर त्याहि देहाचे प्रेम आत्मानात्मविचाराचे वेळेसच नष्ट होऊन ज्ञानापूर्वीहि भक्तीची सिद्धि होऊ शकत नाही. म्हणजे या निर्गुणवादाने सर्व भक्तिमार्गाचाच पुढे उच्छेद झाला असता!

भगवदिच्छेनेच श्रीमहाराजांचा अवतार होऊन श्रुति, युक्ति, अनुभव या वेदान्तमान्य प्रमाणत्रयीच्या साहाय्याने वरील वेदान्तविरुद्ध अपसिद्धान्त खोडून काढून त्यांनी भक्तिमार्गाला

शुद्ध शास्त्रीय स्वरूप आणून दिले.

### *संप्रदायाची स्थापना*

भारतातील वेदाला प्रमाण मानून निघालेले सर्व संप्रदाय भगवंतापासूनच प्रगट झाले आहेत. त्यांचे आचार्य हे त्या संप्रदायांचे केवळ पुनरुज्जीवन करणारे आहेत. त्याचप्रमाणे मधुराद्वैतसंप्रदाय देखील भगवान आदिनाथ शंकरापासून प्रगट झालेला आहे व श्रीज्ञानेश्वरादि संतांनी आपल्या वाङ्मयातून त्या भक्ति-संप्रदायातील भक्तिप्रेमाचे उद्गार काढलेले आहेत. सूत्ररूपाने या भक्तिमार्गाची चिकित्साहि त्यांच्या ग्रंथातून आली असून स्वतः सर्व संतांनी भक्तिमार्गाच्या आचरणाने व उपदेशाने त्याचा पुरस्कारहि केला. पण -

भक्तिशास्त्राचे सविस्तर उपपादन कोणी केले नाही. संतांच्या सूत्रप्राय उपपादनावर श्रीमहाराजांनी भक्तिशास्त्राच्या उपपादनाची श्रुति, युक्ति इत्यादि प्रमाणांच्या साहाय्याने इमारत उभारली आहे. म्हणून हा संप्रदाय नवीन नाही. उपपादन मात्र नवीन आहे.

''येथ आदिनाथ ते मूळ । आळंदीश्वर तें फळ''

असे श्रीमहाराजांनी स्वतः सांगितले असून ''याते नाथसंप्रदाय म्हणती'' असे त्यांनीच सांगून ठेविले आहे. म्हणून श्रीमहाराज या संप्रदायाचे उद्‌घाटक आचार्य आहेत. सर्व संप्रदायांच्या आचार्यांचीहि हीच गोष्ट आहे.

### *मधुराद्वैतदर्शन*

भक्ति म्हणजे तुकाराम महाराज म्हणतात,

''हेचि थोर भक्ति आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ।''

व्यवहारामध्ये कोणते तरी स्नेहाची नाते ठेवून आपण प्रेम किंवा माया करीत असतो.

(१) स्वामीच्या ठिकाणी नोकर-दासाचे नाते ठेवून प्रेम करतो.

(२) मुलगा, बालभाव किंवा लेकुरभाव आपल्या ठिकाणी घेऊन आईबापांचे ठिकाणी मातृपितृभावाने पूज्यता बाळगून प्रेम करतो.

(३) मित्रभावाने मित्र मित्राशी वागतो.

(४) आई मुलाचे ठिकाणी प्रेम करते.

(५) पत्नी, पतीचे ठिकाणी प्रेम करते.

असे ५ प्रकारचे स्नेहसंबंध आहेत. या स्नेहसंबंधाने परमेश्वराचे ठिकाणी प्रेम करणे याला भक्ति म्हणतात. हे स्नेहसंबंध उत्तरोत्तर श्रेष्ठ आहेत; म्हणून त्या उत्तरोत्तर स्नेहसंबंधाने केलेली भक्तीहि पूर्व पूर्व भक्तीपेक्षा श्रेष्ठ ठरते. कारण पूर्व पूर्व भक्तीचा उत्तरोत्तर भक्तीमध्ये अंतर्भाव असतो. अर्थातच पत्नीभावाने केलेल्या भक्तीत पूर्वीच्या सर्व प्रेमसंबंधांचा अंतर्भाव असल्यामुळे, ती भक्ति प्रेमाचे परमोच्च शिखर होय व अशा संबंधाने केलेल्या भक्तीलाच मधुरभक्ती म्हणतात. या भक्तीत द्वैत मुळीच राहत नाही. कारण ती ज्ञानानंतरच करता येते व केली जाते.

''कोणी एक अकृत्रिम । भक्तीचें हें वर्म । योगज्ञानादिविश्राम । भूमिका हे ।''(अमृ. ९-५९)

योगमार्ग व ज्ञानमार्ग यातील सविकल्प स्थिति येथे राहत नाही व प्रेमभक्ति करणाऱ्या

भक्ताचे ठिकाणी दुसऱ्याला द्वैताचा भास झाला तरी -

''द्वैतदशेचें आंगण । अद्वैत वोळगेआपण । भेद तंव तंव दूण । अभेदासी ॥'' *(अमृ.९-२८)*

प्रेमभक्तीने द्वैत निःशेष नाहीसे होऊन अद्वैतदशा अधिकाधिक अनुभवाला येते. श्रीज्ञानेश्वरमहाराजादि संतांनीया सर्व स्नेहसंबंधाने परमेश्वराला आळविले आहे. सर्व संतांच्या गौळणी वगैरे गाण्यांमध्येपत्नीभावाने देवाला प्रेम समर्पण केल्याचेदिसून येते. गोपिका या मधुर भावाने प्रेम समर्पण करणाऱ्यांमध्ये गुरुस्थानी आहेत. भगवान् शंकर आदिनाथ हे भगवान श्रीकृष्णाच्या रासात गोपिका होऊन राहिले आहेत, असे पुराणात सांगितले आहे. त्यांच्यापासून हा मधुराद्वैत संप्रदाय प्रवृत्त झाला.

''स्वमन्तव्यांशसिद्धान्ततुषार'' या ग्रंथात श्री महाराजांनी स्वमुखाने मी गोपी आहे असे सांगितले असून त्यांच्या ठिकाणी मधुर-रस-मंदाकिनीचा प्रेमप्रवाहच मुख्य होता. म्हणूनच त्यांच्या वाङ्मयातून या प्रेमाची सिद्धि व या प्रेमसंबंधानेच विशेषतः भगवंताला आळविलेले दिसून येते.

### ***संप्रदायाचे वाङ्मय***

उगमापासून निघालेल्या नदीचे प्रवाहपात्र जसे पुढे पुढे वाढत जाते त्याप्रमाणे अल्पवयातच प्रगट झालेली श्रीमहाराजांची काव्यस्फूर्ति अमर्याद वाढू लागली. त्यांच्या काव्यस्फूर्तीचे सर्व लिखाण झाले असते तर सुमारे सव्वा लक्ष ओव्यांचा ग्रंथराज प्रसिद्ध झाला असता. काव्यस्फूर्तीचा वेग इतका असे की, लेखकांना लेखन करणेच कठीण जात असे.

सर्व संतांचे ग्रंथ या संप्रदायात मान्य असून मधुराद्वैताचे प्रतिपादन करणारे त्यांचे वाङ्मय पुढीलप्रमाणे आहे. - श्रीमहाराजांचे जे ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले त्या ग्रंथांना ''सूक्तिरत्नावलि'' हेनांव दिले असून प्रत्येक भागाला ''यष्टि'' हे नांव दिलेआहे व प्रत्येक यष्टीमध्ये ज्ञानोत्तर भक्तीचे निरनिराळ्या रीतीनेप्रतिपादन आले आहे.

**प्रथमयष्टि मुख्य ग्रंथ :** (१) भक्तिपदतीर्थामृत- यात तत्त्वमसि महावाक्याचे भक्ति दृष्टीने विवेचन केले आहे. (२) निगमांतपथसंदीपक - ज्ञानोत्तर भक्तीचे उपपादन. (३) निदिध्यासनप्रकाश - यात निदिध्यासनाच्या प्रक्रिया आहेत.

**द्वितीययष्टि (पूर्वार्ध) :** प्रिय पाहुणेर - यात मर्यादा व पुष्टि असे प्रेमाचे दोन भेद करू न दोन्ही प्रकारच्या भक्तीची आवश्यकता दाखविली आहे.

**द्वितीययष्टि (उत्तरार्ध) :** (१) भगवद्भक्तिसौरभ - यात रुक्मिणीने भगवंतास पाठविलेल्या पत्रातील श्लोकांवर पतिपत्नीभक्तीला धरून सुंदर विवरण आहे. (२) प्रीतिनर्तन - यात लालन, वात्सल्य व पतिपत्नीभक्ति ह्या, पूर्वपूर्व भक्तीपेक्षा कशा वाढत्या प्रेमाने केल्या जातात, हे दाखविले आहे.

**तृतीययष्टि :** प्रियलीलामहोत्सव - ही यष्टि म्हणजे श्रीमद्भागवत प्रथमस्कंध यावरील टीका होय.

**चतुर्थयष्टि :** यात स्त्रियांची गाणी दिली आहेत.

**पंचमयष्टि :** अलौ. व्याख्यानमाला - हा ग्रंथ व्याख्यारूपाने आहे.

**षष्ठयष्टि :** स्वमंतव्यांशसिद्धान्त-तुषार (हिंदी) - यात श्रीमहाराजांनी ''आपण कोण व कोणत्या कार्याकरिता आलो'' हे सांगितले आहे व ज्ञानोत्तरभक्तीचे प्रतिपादन केले आहे.

**सप्तमयष्टि :** उपदेशामृत पत्रे- वेळोवेळी आपल्या मंडळीला व बाहेरच्या मंडळींनी विचारलेल्या शंकांना उत्तरादाखल पत्रे त्यांचा संग्रह.

**अष्टमयष्टि :** साधुबोध- यात आधुनिक विद्वानांच्या सामान्य शंकांना उत्तरे म्हणून प्रश्नोत्तररूपानेविवेचन आले आहे.

**नवमयष्टि :** पूर्वार्धः अभंगांची गाथा.

**नवमयष्टि :** उत्तरार्धः पदांची गाथा.

**दशमयष्टि :** प्रेमनिकुंज - यात ज्ञानोत्तरभक्ति कशी होऊ शकते, तिची आवश्यकता, आक्षेपकांचे खंडण, श्रीकृष्णस्वरूपाचे निरुपाधिकत्व असे भक्तीवर सांग निरूपण आले आहे. हा माधुर्यभक्तिरसप्रधान ग्रंथ आहे.

**एकादशयष्टि :** संप्रदायसुरतरु - हा ग्रंथ मुख्यतः भागवत धर्माचा संपूर्ण ऊहापोह करणारा असून मधुराद्वैत संप्रदायाची यात शिकवण दिली आहे.

**द्वादशयष्टि :** यातहि उपदेशामृत पत्रेच दिली आहेत.

**त्रयोदशयष्टि :** यात वेदान्तातील पारिभाषिक शब्दांचे अर्थ दिले आहेत व स्वतःचे ग्रंथ कसे लावावे याची दिशा दाखविली आहे.

बाकीच्या **चतुदर्शयष्टि, पंचदशयष्टि, षोडशयष्टि;**

यातून श्रीमहाराजांच्या अपूर्ण वाङ्मयाचा संग्रह असून नारदभक्तिसूत्रांवर २५ सूत्रांपर्यंत संस्कृत भाष्य आले आहे. षोडशयष्टीत त्यांचे संपूर्ण संस्कृत वाङ्मय आले आहे.

हे सर्व प्रकरणग्रंथ कांही पूर्ण व अपूर्ण आहेत.

### *वेद, स्मृति व भाष्यरूप*

* या संप्रदायात श्री ज्ञानेश्वरमहाराजांचे अमृतानुभवादि ग्रंथ **वेदरूप,**
* इतर संतांचे वाङ्मय **स्मृतिरूप** व
* श्रीमहाराजांचे वाङ्मय **भाष्यरूप** समजले जाते.

### *संप्रदायाची शिकवण : सामान्य*

श्रीमहाराजांनी उदाहरलेल्या संप्रदायाची शिकवण मी त्यांच्याच शब्दात पुढेदेतो -

''येथ आदिनाथ तें मूळ । आळंदीश्वर ते फळ । किंवा आघवाचि कल्लोळ । मधुरसमंदाकिनीचा ।।८९।। म्हणोनि यातें नाथसंप्रदाय म्हणती । श्रीकृष्णोपासना वैष्णवपद्धति । परी ज्ञानसिद्धांत केवलाद्वैती । निश्चित असे ।।९०।। आळंदी मूळ पीठ देख । प्रतिनिधी ते सेवक । आणि प्रतिनिधीवर रूपें अनेक । तातविग्रह ।।९१।। उपास्यत्वें पाहतां साची । शाखा वारकरी संप्रदायाची । जे फळीं पुष्पीं सुखाची । दुमुमिली आहे ।।९२।। द्रुम धर्म सनातन । मूळ तंव ते नारायण । येथ शिव आदि गुरु, देव श्रीकृष्ण । शैववैष्णव मिश्र म्हणोनि संप्रदाय

हा ॥९३॥ दोहींचा समावेश पुरता । श्रीगुरु आळंदीश्वरांत होता । वाढता आनंद मंत्रजपतां । चतुराक्षरी वा सप्ताक्षरी ॥९४॥ सेवक, शिष्य आणि भक्त । हे त्रिविध जन मानिले येथ । सेवकाचे प्रकार दोन होत । अप्रविष्ट आणि प्रविष्ट ऐसे ॥९५॥ जे पतित वा नीच पूर्ण । बळेंची करिती अधर्माचरण । तयातें तंत्रें संकोचून। आणावें धन त्यांजपासुनी ॥९६॥ आतां गृहकार्यासक्त । परी यथाशक्ति प्रतिनिधिवचन मानित । तो जनसमुदाय समस्त । प्रविष्ट सेवक जाणावा ॥९७॥ तयाचे चतुर्थांश धन । सुखें घ्यावें याचना करून । नाहीं तरी अप्रविष्टपण । देयावें तयातें ॥९८॥ साधनचतुष्टयसंपन्न । मुमुक्षु शिष्य म्हणविती पूर्ण । तिहीं करावे कार्य तीन । प्रातःकाळी जप योग ध्यान । संप्रदायानुसार ॥९९॥ माध्यान्हाकालीं ज्ञानचर्चा पूर्ण । अथवा करावे ग्रंथलेखन । सायंसमयीं हरिकिर्तन । प्रेमे करोनी करावे ॥१००॥ कीर्तनाचें न घेयावें धन । यति तरी खावें भिक्षा मागोन । नाहीं तरी थोडीशी निश्चिंती पूर्ण । मीं केली तेवी करावी ॥१०१॥ बहुशा ऐसी समयरीती । अविरोध न येतां संप्रदायाप्रति । मध्ये संप्रदायकार्य येती । तेही कीजती उल्हासे ॥१०२॥ शरीरापुरते स्वकार्य पाही । त्याचा उपदेश न लगे कांहीं । सेवकापासुनी जे आणिले लवलाहि । तें धन स्वकार्या लावूं नये ॥१०३॥ तया धनेंकरून । नवे करावेत शिव-कृष्णालयें जीर्ण । पुस्तकालयें बांधोन । करावे पूजन तयाचे ॥१०४॥ अ.११.सं.सुरतरु

### *समाधिसेवा*

''विशेष संप्रदाय पद्धति । नित्य भावावी आळंदी चित्तीं । तियेची यथार्थ उपपत्ति । नित्यतीर्थी बोलिली ॥२१॥ दुसरें ऐसे भावावे मनीं । कीं समाधींत बैसले कैवल्यदानी । ते आणिकां ऐसी निर्वाणीं । समाधी नोहे ॥२२॥ मायबाळा एकांती । जेवूं घाली बाळाप्रति । कीं प्रियेची पुरवाया आर्ती । प्रिय एकान्तीं जेवि बैसे ॥२३॥ तेवि तया सुंदरपणा । दृष्टि लावील जनतारकांगना । म्हणोनि समाधिमिषें समष्टिहृदयभुवना । केले पावन एकसरें ॥२४॥ मिया मूर्ति देखिली जैसी । आणिकी न देखिली तैसी । परी सांप्रदायिकी मूर्ति विशेषी । प्रसिद्ध मानाव्या ॥३१॥ ज्या आहाती भिंतीवरी । कीं ज्या लिहिल्या आहाती चित्रीं । त्या पूजाव्या निर्धारीं । सप्रेम भावें ॥३२॥ या ध्यानानुसार करावी मूर्ति । अथवा समाधि सेवा जे अलकावती। तेचि प्रमाण मानोनि चित्तीं । धरावी प्रेमें ॥३४॥ जेवढा वेळ संसारी । तेढी करावी आळंदीवारी । आजानतरुतळीं अनुभवामृत ज्ञानेश्वरी । वाचावी प्रेमें ॥३५॥ इंद्राणीतीरीं बैसोनी । हरीपाठ म्हणावा वदनीं । विश्रांतीवटातळीं बैसानी । चांगदेवपत्र पैं जपावे ॥३६॥ षोडशोपचारें ओजा । पूजावा आळंदीचा राजा । संत ब्राह्मणातें शक्ति सहजा । पूजोनी भोजन घालावे ॥३७॥ जे जे काज येईल वाटणी । तें मोल न घेतां करावे प्रीतीकरूनी । किंवा पालखी

स्कंधीं धरूनी । बृहस्पतिदिनीं सुखी व्हावे।।३८।। आरती सेज काकडआरती । प्रेमें कराव्या प्रीती । नगर प्रदक्षिणा यथानिगुती । सप्रेमचित्तीं आचराव्या ।।३९।। तृणपाषाणां करावे वंदन। मनाते वाटावे क्षणक्षण । कीं अझोनी भासे भेदभाव । अभेदवंद होईल केव्हां ।।४०।। जेढे तीर्थ प्रगट असती । तेवढे सविधि पूजावे प्रीती । गुप्ततीर्थ ते भावावे चित्तीं । हें बोलिले महाभारतीं पाराशर्य ।।४१।। परी प्रगट तीर्थाहून । गुप्ततीर्था विशेषपण । मानोनी अनादरमय मन । होवो न द्यावे प्रगटाविषयी ।।४२।। अनादरें न पहावे गुप्त । जे देखते जाहले एकनाथ। तें चित्तेंचि पहावेनित्य तीर्थ । जेथे तात विराजती ।।४३।। पुर्जोप्तश्रीहैबतीराय । त्यांनी जो क्रम दाविला होय तैसाची आचरावा स्वयें । आगमवत ।।४४।। नित्य सेवावे प्रसाद तीर्थ । उटी पहावी प्रेमरित ।किंवा करावे समस्त । आपुलेनि हाते ।।४५।। *(अध्याय ४ था, संप्रदाय सुरतरु)*

## *स्वतःचे घरीं राहून सेवा*

''का मनाचेनि दुर्बळें । जें सेवासमयी विघ्न खवळे । तैं गृहींहि असोनी भावनाबळें । रहावेआळींद ।।४७।। गृहकार्याते करोनी । परसंग रसायनीं । हृदयीं तप्त जेवी जारिणी । तेवि स्मरणीं असावे ।।४८।। उटी चंदन इंद्रायणीतीर्थ । गोळी करोनिया समस्त । गृहीं आणोनी सन्निहित । हरिपाठ पाठ करावे ।।४९।। इतर सजातीय भावना । भावोनी करावे ग्रंथपठणा । आणि आणोनि आजानशुष्कपर्णा । तत्सन्निध अनुभवामृतादि पठणा कीजे ।।५०।। पालखीचिया संगतीं । फावलीया वेळीं निश्चिती । पंढरीहि पहावी प्रीती । किंवा आळंदीप्रति असावे ।।५१।। गृहीं जें सांगितलें अर्चन । तेथ पुजाव्या पादुका आणोन । कां स्वदेशी योग्य प्रतिनिधी गणून। तेथ प्रतिदेशपादुकास्थान करावे ।।५२।। मग प्रतिनिधीचिया अनुज्ञा । योग्य पूजा आदि करोनी प्राज्ञा । पादुकाधारणसंज्ञा । स्वकीय कीजे ।।५३।। म्हणोनि पादुकांची पूजा । षोडशोपचारें करावी ओजा । प्रतिनिधिस्थानी सहजा । सुखासनोत्सवादि [पालखी] करावे ।।६९।। हैबतिरायें जो क्रम । आळंदींत ठेविला सप्रेम । तोचि भजनादि नियम । स्थानींहि कीजे ।।७०।। पांच अभंग पालखी समयीं । म्हणोनी, आनही म्हणावें कांहीं ।मत्कृत हैबतिराय आरति गावी । विशेष एक ।।७१।। दशमीचिये दिनीं । हैबतिराय आरति म्हणूं नये वदनीं । किंवा पालखी झालियावरी मनेंचि देहूस जावूनि । मग तुकाराम आणि हैबतिराय पूजावे ।।७२।। पाळावे गुरुवासरव्रत । कार्तिक वद्य त्रयोदशीं उत्सव पहावा आळंदींत । गृहीं आचरूं नये ती रीत । अन्योत्सव निश्चित करावा ।।७३।। पादुकाचिया स्नानीं । आणावी शुद्ध इंद्रायणी । किंवा मंदाकिनी वा त्रिवेणी । स्नान घालावे ।।७४।। उत्तर गंगा हरिद्वार प्रयाग । येथोनी कावडी भराव्या सवेग । श्रीगुरुरामेश्वरलिंग । अभिषेकावे आळंदीये।।७५।। मग ते तीर्थ आणोनी । नित्य पुनीत व्हावे

पिवुनी । नैवेद्य प्रसाद आणावा सदनीं । रूढी अनुगुणीं अन्न वा फराळ ॥७६॥ जे जे उपचार जैसे मिळती । बाह्य पूजा करावी तिये रीती । दास्य दीक्षा घेवोनी प्रीति । बाह्यपूजा आरंभिजे ॥८०॥ (अध्याय ४ था, संप्रदाय सुरतरू)

दास्यदीक्षा घेऊन बाह्यपूजा करता करता एकेंद्रियता आली म्हणजे मग संबंधदीक्षा घेऊन प्रेमभक्ति करावी.

लालन, वात्सल्य, माधुर्य असे तीन संबंध आहेत.

पुरुषांना बहुतेक लालनच हितावह आहे. लालन म्हणजे श्रीगुरूला किंवा देवाला आईबाप समजून प्रेम करणे होय.

स्त्रियांना श्रीगुरूचे किंवा देवाचे ठिकाणी वात्सल्य करणे हितावह आहे. वात्सल्य म्हणजे श्रीगुरूला किंवा देवाला आपले लहान मूल समजून प्रेम करणे होय.

ज्यांना आत्मज्ञान झाले आहे त्यांनी देवाला पति समजून प्रेम करणे उत्तम होय.

भक्तीत भगवत्प्रेमामुळे विषयांचा वीट आला असल्यामुळे, या कोणत्याहि भक्तीत विषयसुखाचा मुळीच संबंध नसतो व त्यातल्या त्यात दृढ ज्ञान्याचे ठिकाणी तर तो मुळीच नसतो.

### *संप्रदायाची पूजास्थाने*

(१) आळंदी मुख्य (२) वृंदावन (३) मथुरा (४) प्रयाग (५) पंढरी (६) हरिद्वार (७) काशी वगैरे द्वादश ज्योतिर्लिंगे; इत्यादि संप्रदायाची पूज्यस्थानेआहेत.

### *संप्रदायाची व्याप्ति*

श्रीमहाराजांच्या हयातीत पुष्कळ लोकांशी त्यांचा परिचय झाला. चर्चा, संवाद वगैरेहि पुष्कळ लोकांनी त्यांच्यापाशी केले. हे सर्व सविस्तरपणे त्यांच्या चरित्रात आले आहे. पण - अत्यंत निष्ठावंताखेरीज त्यांची कोणाला सांप्रदायिक किंवा शिष्य करण्याची प्रवृत्ति नसल्यामुळे, त्यांच्या अनुयायांची व्याप्ति फार थोडी आहे. अजूनहि तीच शिकवण पाळली जात असल्यामुळे संप्रदायाचा शिष्यपरिवार कांही मोठा नाही.

तरी पण त्यांच्या ग्रंथाचा अभ्यास करणारे व तद्द्वारा त्यांच्याबद्दल आदर असलेले लोक पुष्कळ दिसून येतात. श्रीमहाराजांवर अत्यंत निष्ठा असल्यामुळे त्यांचे गुरुत्व ज्यांनी पत्करलेअसे पुरुष जुने व नवे मिळून शंभराचे आंतच आहेत.

श्री. रामचंद्र बापू मोहोड माधानकर, श्री. गणपतराव बापू सावळीकर, श्री. आकाजी बापू यावलीकर, श्री. हरीभाऊ केवले सावकार (हे आद्य ग्रंथलेखक होत), नानाजी कविमंडण, वासुदेवराव वामनराव मुळे (हेडमास्तर निलसिटी हायस्कूल, नागपूर), वे.शा.सं. श्रीनिवासशास्त्री हरदास (हे नागपूर येथील काव्यज्ञ व वैय्याकरणी होते.) श्री. गणपतराव खंडो भालेरावमास्तर, दत्तोपंत खापरे, वकील (एम्.ए.,एल्एल्बी.), नारायण पंडित, गंगाधर बाळकृष्ण मुळे, श्री.मारुतीराव रामेकर, श्री.काशीनाथराव आठवले(रिटायर्ड सबजज्ज), श्री नारायणराव

केकरे वकील हर्दा, श्री. दिनकराव गोखले वकील खांडवा, श्री. गणपतराव केकरे, हर्दा, श्री. सितारामपंत घाटे मास्तर (राजकुमार कॉलेज, रायपूर), श्रीमंत शेठ अंबादास रामरख मारवाडी, यावली, श्री. ज्ञानेश्वर उद्धव मांढरे, पुणें, श्री. व्यंकटराव देशपांडे, श्री. राजेश्वरराव त्रिपुरवार (चरित्रलेख), श्री. विट्ठलराव केकरे, वकील, मंडला, श्री. विष्णु बापुजी धामापुरकर, प्रोफसर ॲग्रिकल्चर कॉलेज, नागपूर इत्यादि पुरुष मंडळी व सौ. मातोश्री रंगुबाई देशपांडे, सौ. मातोश्री दुर्गाबाई परुळकर, गं.भा. मातोश्री ताई केसकर, शिरसगांव इत्यादि बायामंडळी त्यांच्या सान्निध्यात राहिलेली आहे. नवीनहि अनुयायी बरेच आहेत. तरी संप्रदायाचा व्याप वर सांगितल्याप्रमाणे फार मोठा नाही.

### *सांप्रदायिक उत्सव*

* गोकुळअष्टमी, * कात्यायनी व्रतोत्सव, * शिवरात्री-उत्सव व * रामनवमी इतके उत्सव होतात.

### *सध्या चालू असलेले संप्रदायकार्य*

* श्री महाराजांनी 'संप्रदायसुरतरु' ग्रंथात सांगितलेल्या मार्गांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पादुका व श्रीकृष्ण मूर्ति यांची पूजाअर्चा,
* वेदान्त चर्चा,
* भजन,
* श्रीमहाराजांच्या ग्रंथातून प्रतिपादलेल्या तत्त्वांचा प्रवचन-द्वारे पुरस्कार,
* श्रीमहाराजांचे अप्रकाशित ग्रंथ प्रकाशित करणे,
* त्यांच्या ग्रंथसंग्रहालयाची व्यवस्था;

इत्यादि संप्रदायाचे कार्यचालू आहे. – **इति शम्** ॥

(धर्मचक्र मासिक १९५३ / विविध लेखसंग्रह भाग ११९६५)

### श्रीमहाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार

## श्रीबाबाजीमहाराज पंडित

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले.१९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल, घरदार, शिक्षण, वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला. महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहान-मोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत तेही प्रमुख होते.त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच कांहीदेखील मागितलं नाही.त्यांचे ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्‌गार काढले- ''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन अमोघ आशीर्वाद दिला - 'अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही. माझे ग्रंथ वाच. तुला समजतील!'

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं.' पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं.

त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत.

अन् पंडितांच्या अखंड परिश्रमांतून महाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली.

दृष्ट लागावं असं अक्षरशिल्प मुद्रांकित झालं.आणि सर्वांना उपलब्ध झालं !

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# *ती. काकाजींचे चरणसेवेशी*

*बालके बाबूचा शिरसाष्टांग दंडवत. विज्ञापना विशेष.*

पत्र लिहिण्याचे कारण की अत्यंत आनंदाची व महत्वाची बातमी अशी की परात्पर सद्गुरु पूजनीय श्री. मोठे महाराज म्हणजे श्रीगुलाबरावमहाराज यांच्या सर्व १३२ ग्रंथांच्या विषयसूचीचा कोषग्रंथ (एनसायक्लोपिडिया) जो तुम्ही ३०, ४० वर्ष खपून तयार केला होता तो आता ''ग्रंथराज श्री माधुर्य मधुकोष'' या नावाने छापण्यास देण्यात आला असून लवकरच तो कात्यायनी शताब्दीचे मुहूर्तावर समारंभपूर्वक प्रकाशित करण्यात येत आहे खरे तर या कार्यास फारच विलबं झाला आहे. परंतु शेवटी पूजनीय श्रीमहाराजांच्या इच्छेमुळेच हे कार्य आमचे हातूनघडत आहे.

दुसरी आनंदाची गोष्ट म्हणजे याची प्रस्तावना आपल्या नित्य संपर्कात असलेले ती. अण्णासाहेब पंडित ह्यांनी लिहिली आहे. यादवचा मुलगा चि. मधुकर याने या बरेच कष्ट घेऊन पूर्ण ग्रंथराज टंकलिखित करून घेतला.

काकाजी, आजच्या ह्या प्रसंगी मागील जुन्या साऱ्या आठवणी मनात गर्दी करीत आहेत.

आपल्या परिवारात आपला जास्ती संबंध रा. तुकारामजी ठाकरे दिवाणजी यांचेशी आला. ते आम्हा बंधूहून जास्त भाग्यवान् म्हणावे लागतील. त्यांचाहि तुमच्याविषयी फारच कोमल भाव होता. बोलताना ते सारखे 'काकाजी, काकाजी' म्हणून आपली एक एक आठवण सांगत असत. आमच्या आग्रहाने एकदा तुम्ही त्यांच्यासोबत चिटणीस पार्कमध्ये 'मौत का कुवा' पाहायला गेला होतात. त्यावेळेस तुकारामजी तुम्हाला म्हणाले होते -

आपल्या जवळ इतके ज्ञान आहे तर आपण लोकांना कां सांगत नाही जी ?

त्यावेळेस तुम्हीच त्यांना विचारले 'तुकाराम, हे जग कोणी निर्माण केले आहे ?

ईश्वराने !

मग त्याची व्यवस्थाहि त्यानेच केली असेल, होय ना ?

हो महाराज !

मग कोणी काय करावे, हे सुद्धा त्यानेच ठरवलेअसेल ना ?

हो जी.

मग आपण त्यात कारभार करण्याची गरज काय ?

असे उत्तर देऊन आपण तुकारामजींचं समाधान केलें. लोकेषणा आपल्या आजुबाजुलाहि फिरकत नसे. पूर्ण निस्पृहता तुमच्या लहानसहान वागण्यातहि जाणवत असे.

एकदा तुम्ही त्यांना ''संप्रदाय हे सुरवातीला १६ आणे व पुढे १४ आणे १२ आणे होता होता ४ आण्यापर्यंत जातात'' असे म्हटले होते. खरंच संप्रदायाची आजची स्थिति

पाहिली की इतक्या लवकर ही अशी वेळ येईल असे वाटले नव्हते. - आपल्या पहिल्या पिढीतील मंडळीच्या मुलाबाळांचा ओढा कमी झालेला आहे ! पुष्कळांचा तर दुरान्वयानेहि संबंध राहिलेला नाही ! याची फार खंत वाटते.

- पण आमचेच प्रयत्न कमी पडले. याहून दुसरे पाप ते कोणते ! अनंत जन्मात कधीतरी येणारा एवढा मोठा भाग्यशाली संबंध ! परंतु आता श्रीमहाराजांनाच विसरत चालले आहेत.

काकाजी कलकत्ता नागपूर या प्रवासात तुमची महात्मा गांधी यांची भेट झाली होती. तुम्ही नुकतेच लॉ, एम.ए. वगैरे झाले होते. तुम्ही त्यांना ओळखतहि नव्हते. तेहि आफ्रिकेतूनच आलेले बॅरिस्टर म्हणून होते. तुमचे आणि त्यांचे इंग्रजीतूनच संभाषण चालू होते. तुम्ही आम्हांला सांगितले की 'माझ्या इंग्रजीतील चूका काढून त्या दुरुस्त करून 'असे बोलू नये, असे बोलावे' वगैरे समजावून सांगत होते. त्यांची विद्वत्तेने प्रभावित होऊन तुम्ही त्यांनात्यांच्या क्वालिफिकेशनबद्दल विचारले -

'आर यू एम्.ए. ऑर - - - ?

त्यावर ते हंसून 'नो व्हॉट अबाऊट एम.ए.? आय ॲम एम.एज पुट टू गेदर'

नंतर त्यांनी तुम्हाला भेटण्यासाइी व्हिजीटींग कार्ड दिले होते. पण मोठ्या महाराजांचा व आपला संबध आला. आणि त्यानंतर तुम्हीहि पुनः महात्माजीना भेटण्याचा प्रयत्न केला नाही. काकाजी मला वाटते तुम्ही केवळ परमार्थीच होते आणि ऐहिक गोष्टीत आपणाला रसच नव्हता.

तुम्ही एम्. ए. इन फिलॉसॉफी केल्यावर पुढे जर्मनीला त्याच विषयात पुढील शिक्षण घेण्याचे तुमचे ठरले होते. पार्थिव पुजेसाठी माती, बेल इ. वस्तु पिप्यामध्ये जमा करून ठेवणे चालू होते. परंतु इ.सन १९१४ चे महायुद्ध सुरू झाले. व आपल्याला जाणे रहित करावे लागले.

मॅट्रिक ११ वी तुम्ही पास झाले. त्यावेळी सी.पी अँड बेरार प्रांतात सर्वप्रथम आले. परंतु तुम्ही श्रीमंत मालगुजार म्हणून बोर्डाने तुम्हाला स्कॉलरशिप दिली नाही. खट्टू होऊन 'मग इतकी मेहनत कशाला करायची' म्हणून पुढील एम.ए.एलएल.बी. परिक्षा दिली व त्यातहि फर्स्टक्लास मधे पास झालां.

एकदा मी तुम्हाला 'काकाजी. तुम्ही प्रोफेसर म्हणून काशी-बनारस किंवा अलाहाबादला का गेले नाही जी' असे विचारले.

त्यावेळेस 'जे विद्यार्थी वगैरेजण स्वतंत्रता आंदोलनात भाग घेत त्यांची माहिती गुप्तहेर म्हणून प्रोफेसरांनाब्रिटीश गव्हर्नमेंटला द्यावी लागे म्हणून ती नोकरी मी केली नाही' असे तुम्ही म्हणाला होतात.

नंतर तुम्ही वकीली सुरू केली पेुढमहात्मा गांधीनी वकीलीवर बहिष्कार टाकण्यास सांगितला. निस्पृह म्हणूनप्रसिद्ध असलेले श्री मा.ज.कानेटकर यांचे आग्रहामुळे एक वर्ष

वकिली बंद ठेवली. पुढे सावनेरवरूनच नागपूरला प्रॅक्टीस सुरू केली.

पुढे नागपूरला आल्यानंतर मोठमोठ्या नागपूरच्या प्रसिद्ध व्यक्तींशी आपला संबंध आला. डॉ. हेडगेवार, डॉ. परांजपे, डॉ. ना. भा. खरे, लोकनायक बापुजी अणे, तात्याजी वझलवार प्रिं. पांढरीपांडे, मा.ज. कानेटकर, डॉ. मुंजे, भाऊजी दप्तरी इ. सर्व मंडळीत आपले वजन होते.

काकाजी, मोठे महाराज तर आपले जीव की प्राण म्हणजे सर्वस्वच होते. आणि त्यांचीहि आपल्यावर पूर्ण कृपाच होती. इतरहि सांप्रदायिकात विशेष करून आपले परम स्नेही पूज्य वेदांतकेसरी श्रीबाबाजी महाराज पंडित, सर्वश्री अण्णाशास्त्री हरिदास, मुळेमास्तर, भालेरावगुरुजी, पाध्ये बंधु (गोपाळराव व गोविंदराव) श्रौती सेशन जज, नानाजी कविमंडन डिस्ट्रीक्ट अँड सेशन्स जज असलेले आपले खास मित्र काशीनाथराव आठवले इ. प्रमुख गुरुबंधु होते. फिरावयास जाण्याच्या निमित्ताने आपल्या सोबत राहिल्यामुळे मलाहि त्यांचे दर्शन घडेव त्या निमित्ताने श्री मोठ्या महाराजांच्या आठवणीहि ऐकावयास मिळत. अर्थात् वय लहान असल्यामुळे विशेष समजत नव्हते. तरिहि ऐकावेसे मात्र वाटे.

पूज्य श्रीबाबाजीमहाराज यांचे राहणे संस्थानमधे असल्यामुळे आपण चंद्रूरचे सर्व विकवाक करून संस्थान जवळ मुद्दाम घर विकत घेतले, त्यांचे नित्य दर्शन संत समागम व मोठ्या महाराजांच्या आठवणीहि आम्हाला ऐकावयास मिळत. हा दुग्धशर्करायोग घडत असे. तुमच्या विषयी, आपले मोठे बंधु ती. बापुसाहेबजी हे काका म्हणूनव श्रीमहाराज मामाजी म्हणून, यांचे विषयी आमचा सारखाच भाव होता. तुम्ही गेल्यानंतर महाराजांना कांही प्रसंगाने - 'महाराज मी आपल्याला बापासारखाच समजत होतो म्हणूनबोललो नाही जी' असे म्हटले तेव्हा ते देखील - 'ठीक बरोबर आहे म्हणाले.'

एकदा 'संप्रदाय सुरतरु' हा ग्रंथ मी वाचत असण्याचे तुम्हाला समजल्यामुळे ''कायरे महाराजांनी माझ्याकडून पापे घडलीत, असेजे म्हटले आहे. तेखरे वाटते काय?'' असे विचारले. त्यावर मी तुम्हाला 'ते सर्व खोटे आहे जी' असे म्हटले, त्यावर तुम्ही हंसले व 'बरोबर' असे म्हणाले.

एकदा तुम्ही बोलता बोलता म्हणाले. 'सगळीकडूनचांगला ठेचल्या गेल्याशिवाय परमार्थात खरे मन लागत नाही. तर एके प्रसंगी प.पू. श्री मोठे महाराज 'कायरे, जगाला सुधारण्याचा ठेका तुझ्याचकडे दिला आहे ना' असे म्हणाल्याचे व नंतर आपण ओशाळून त्यांची क्षमा मागितल्याची आठवण सांगितली.

काकाजी, अमरावतीचे पूज्य श्री.नानाजी कविमंडन (नवपंचकातील ऱ्हीं लक्ष्मणाय नमः ऱ्हीं) हे तुमच्या भेटीला आल्यानंतर मोठे महाराजांच्या आठवणी निघत. एक प्रसंग आजहि मनःचक्षु पुढे येतो. त्यावेळी तुम्ही नानाजीला म्हटले होते की श्रीमहाराजांनी एकदां -

'माझेनंतर पंडिताला (ऱ्हीं नारायण नमः ऱ्हीं ) संप्रदाय सोपवायचा आहे. परंतु हा नाना जरा तापट आहे कसे काय होईल?' असे म्हटले.

त्यावेळेस तुम्ही श्री महाराजांस 'महाराज आपण नानाची काळजी करू नका. त्याचा जामीन मी राहातो' असे आश्वासन दिले. त्यावेळी महाराजांनी आपल्या मुखातून अग्नीच्या ज्वाळा काढण्याचा प्रसंगहि नानाजींनी सांगितला होता.

काकाजी, आपलया लोकांचे महाराजंविषयी प्रेम अवर्णनीय होते. आळंदीचा एक प्रसंग आठवतो आहे. आपण सर्वजण पूज्य श्री बाबाजीमहाराजांबरोबर गोपाळाचे मुंजेनिमित्य श्री आळंदीला बऱ्याच मंडळीबरोबर गेलो होतो. त्यावेळेस श्री ज्ञानेश्वरमहाराजांना अभिषेक वगैरे झाल्यानंतर माउलीच्या दर्शनाने तुमची अंतर्बाह्य स्थिती भावूक झाली होती. तिथून दत्त मंदिरात आल्यावर तुमची स्थिती अधिकच द्रवित झाली. श्रीबाबाजी महाराजांस पाहून त्यांचे चरणावर लोटांगण घालून ढसाढसा रडायला लागले व ''मला सांभाळा, महाराज, मला सांभाळा. मी आपल्याच भरंवशावर आहे'' असे म्हणूंलागले.

ते आपले पाय सोडवूनदुसरीकडे जायचे तरी परत त्यांचे चरण धरून म्हणणे चालूच. शेवटी महाराज स्वयंपाक घरात गेले. इकडे तुमची स्थिती फारच करुण झाली. मी आणि आई घाबरून गेलो. व मी महाराजांकडे जाऊन त्यांचेकडे केविलवाणे पाहून मनात याचना करू लागलो. श्रीमहाराजांचे लक्षात आले- पोरगा घाबरला म्हणून. त्यांनी लगेच परत येऊन तुमची समजुत घातली व सांत्वन केले. व अशारितीने तो प्रसंग निभावला. (तसे मला तुमचे परममित्र काका आठवले यांनी मला घरी ओलावून तुमचेकडे विशेष लक्ष देण्यास सांगितले होते) त्यानंतर पुण्याला श्री महाराज व आपण टांग्याने श्री बापुजी अणे आजारी असताना त्यांना भेटण्याकरिता गेलोहोतो.

काकाजी, आपले मोठेबंधु स्व.बापुसाहेबजी नागपूरला आजारी होते. त्यावेळी डॉक्टरांनी हर्नियाचे ऑपरेशन करावे लागेल व ३ ते ४ हजार रुपये खर्च येईल असे सांगितले. त्यावेळी बापुसाहेबजीनी 'फार जास्त खर्च आहे' असे म्हटले. त्यावर डॉक्टर हसून 'तहसिलदार म्हणून कमाईहि झाली असेल ना.' असे हळूच म्हणाले. त्यांना तर ऐकूं आले नाही. परंतु तुम्ही ऐकले. व डॉक्टरांना 'काय म्हणताय डॉक्टरसाहेब, तहसिलदारीत कमाई केली म्हणून ?''

डॉक्टर चपापले व म्हणाले 'तसं काही म्हणायचं नाही मला.'

परंतु तुम्ही त्यांना - 'डॉक्टरसाहेब तुमचा गैरसमज झालेला दिसतो आहे. एक सांगतो तुम्हाला. बापूसाहेब त्यांचे संपूर्ण आयुष्यात कोणाच्या एका सुतळीच्या तोड्यालाहि शिवले नाहीत, हे लक्षांत ठेवा.'

तुमचा व बापुसाहेबजींचा दोघांचा मिळून फोटोकाढण्याचे ठरले. पण तुम्ही त्याला तयार नव्हते त्यावेळी 'भाऊसाहेब नसतील तर मीही फोटो काढणार नाही असे बापुसाहेबजी म्हणाले. मग दोघांचा एकत्र फोटोकाढला.

एकदां सोवळ्या ओवळ्याच्या प्रसंगावरून 'बापुसाहेबांना जे सोवळ्या ओवळ्याच्या बाबतीत चालत नाही ते मलाही चालत नाही, असेतुम्ही म्हणाले. तुमचेपरस्परांवरचेप्रेम, आदर व आज्ञाधारकपणा पाहून लोक तुम्हां बंधूंना रामलक्ष्मणाची जोडीच म्हणायचे. गेल्या ४० वर्षात आता सोवळे पार लयाला गेले आहे. पुढे बापुसाहेबजी कात्यायनी उत्सवात

ब्रम्हपुरीला गेले होते व त्याच उत्सवात त्यांचे देहावसान झाले. त्यांचे पार्थिव शरीर नागपूरला आणण्यात आले. तेंव्हा तुम्ही त्यांचे छातीवर डोके ठेवून रडले. त्याचवेळी तुम्हास त्याचा हुंकार स्पष्ट ऐकूं आला. तुम्ही ही गोष्ट आम्हाला नंतर सांगितली. परंतु माझ्या मनात शंका आली की हे कसे शक्य आहे ? पण पुढे श्री महाराजांच्या ग्रंथात वाचण्यात आले की धनंजय नावाचा वायू जोपर्यंत शरीरातून निघून जात नाही तोपर्यंत मनुष्याची अहंता त्या देहावर असते व योगी याच आधारावर मृतमनुष्याला जीवंत करू शकतात. त्यामुळे माझे समाधान झाले.

काकाजी तुम्ही सोवळ्यात असताना एका प्रसंगी तुम्ही कोणाला तरी वरून श्रीमहाराजांचे पुस्तक आणण्यास सांगितले. त्यांनी ते पुस्तक आणून उभे राहूनच खाली टाकले. त्यावर तुम्ही त्यांच्यावर डोळे वटारले व रागावून ''पुस्तक असे टाकत असतात काय?'' असे म्हणाले.

एकदा मी तुम्हाला ''श्रीमहाराजांची सर्व पुस्तके मला देऊन टाकाजी'' असे म्हटले.

त्यावेळेस तुम्ही ''शेतीवाडी पैसे घर दार सगळे तुम्हाला दिले. आता पुस्तकेही मागता काय ?'' असे कळवळून म्हणाले. त्यावर मी चपापलो. नंरत थोड्या वेळाने ''वाटले तर एखादे वाचायला घेत जा'' असे म्हणाले.

ती. स्व. आबाजी पंडित, नारायणभैय्या केकरे, वासुदेवराव हरदास, तात्याजी वझलवार, काकासाहेब आठवले, बाबासाहेब, रामभाऊ, तात्यासाहेब, चि. माधव, यादव, ती.बबुताई, आई ताराबाई, सुशीलाबाई मनोहरराव यांचेहि अनेक प्रसंग या निमित्ताने आठवतात.

काकाजी, तुम्ही जाण्याच्या ५,६ महिने आधी 'आता तुम्ही सर्वांनी श्री महाराजांचा मंत्र घ्यावा' असे आम्हां घरच्यांना म्हटले होते. त्यावर मी 'आम्ही मंत्र घेण्यासाठी लहान आहो' असे म्हटले.

त्यावर 'तुम्ही कशाचे लहान आहात रे, आम्ही मोठे महाराजांच्या वेळेला १७, १८ वर्षाचेच तर होतो.' असे म्हणाले. तुम्ही गेल्यावर नंतर लवकरच आम्ही लोकांनी मंत्र घेतला.

काकाजी, एक मोठा प्रसंग आठवतो. तम्ही ३०, ४० वर्षेखपूनआपण श्री मोठ्या महाराजांच्या समग्र ग्रंथांतून हा 'मधुकोष' तयार केला. हे काम पूर्ण झाल्यानंतर कांही दिवसांनी श्री अण्णासाहेब पंडित पूज्य श्रीबाबाजीमहाराजांच्या सांगण्यावरून घरी आले व तो ग्रंथ घेऊन निघाले. त्यावेळेची तुमची स्थिति आजहि आठवते. तुमच्या आंगाला दरदरून घाम आला होता. श्री मोठ्या महाराजांच्या आठवणीने तुम्ही व्याकुळ झालां होतांत. मी तुम्हाला पंख्यानेवारा घालीत होतो.

'आपल्या मंडळीत मोठ्या महाराजांच्या आज्ञा तंतोतंत पाळणारे- महाराज, तुम्ही एकटेच आहांत' असे तुम्ही बाबाजीमहाराज तुमचे भेटीला आले असतांना त्यांना म्हणाल्याचे आजहि स्मरते. तुम्ही श्री बाबाजीमहाराजांसोबत आयुष्यभर छायेसारखे वावरलेत, हे श्रीमहाराज व काही मंडळीच जाणून होती. अणि यासाठीच तर तुम्ही नागपुरात संस्थानचे

जवळ राहण्यास आलांत.

शेवटच्या काळात तुम्हाला दवाखान्यात भरती करण्यात आले होते. आम्ही घरीच होतो रात्री तुम्ही अत्यवस्थ असल्याचा फोन आला. तेव्हढ्यात ती.स्व.ताराबाई रडत रडत खाली आल्या व ''मोठे महाराज माझ्या स्वप्नात आले व त्यांनी आईचे कुंकु आपल्या हातानी पुसले'' असे म्हणाल्या. आम्ही समजायचे ते समजलो.

काकाजी, तुम्ही गेल्यावर महिना दीड महिना तुमच्या आठवणीने अति व्याकुळ होतो. न राहवून एक दिवस श्री महाराजांकडे रडत रडतच गेलो. व त्यांचे पायी पडून'महाराज काकाजी गेलेजी, मला काही सुचत नाही.'' म्हटले त्यावर त्यांनाही आठवण येऊन त्यांच्याही डोळ्यात पाणी आले आणि त्यांनी माझे सांत्वन केले.

एके प्रसंगी श्रीमहाराज म्हणाले. ''तुम्ही सर्व पोरं भाऊसाहेबांची काय बरोबरी करूं शकतां ! ते महापुरुष होते, हे लक्षात ठेवा म्हणजे झाले !''

अशा आपल्या घराण्यात आमचा जन्म झाला. आपल्या संबंधाने महाराजांच्या ह्या सर्वश्रेष्ठ संप्रदायात आमचा प्रवेश होण्याचा योग आला. त्यामुळे कृतकृत्यता वाटते. परंतु पारमार्थिक प्रगतीबाबत ठोंब्याच राहिलो. श्रीबाबाजीमहाराज, नानाजी, तुम्ही व त्यावेळेच्या सर्वमडंळीचे श्री मोठ्या महाराजांविषयी असलेले अलोट प्रेम पाहून आश्चर्य वाटते. त्यांतील एक लक्षांश जरी मला लाभला तरी हा नरजन्म सार्थकी लागला असे मी समजतो..

काकाजी, तुमच्या विद्येची, ज्ञानाची, भक्तीची, श्रद्धेची, निस्पृहतेची, वैराग्याची, श्री महाराजाविषयीच्या अपार प्रेमाची, शुद्ध चारित्र्याची, बंधुप्रेमाची व आदराची आणि प्रसिद्धिपराङ्गमुखतेची आम्ही थोडी सुद्धा बरोबी करू शकत नाही. तुम्ही आभाळाएवढे मोठे आहात. मागील जन्माच्या मोठ्या पुण्याईने आमचा आपल्या पावन वंशात जन्म मिळाला हे आमचे भाग्यच होय. आम्ही सगळे भाऊ मिळूनहि तुमच्या नखाची बरोबरी आम्ही करू शकणार नाही, हेच खरे वास्तव आहे.

काकाजी, आपल्या आज्ञेप्रमाणे मोठ्या महाराजांची 'जयंती' कुळाचाराचा सण म्हणून आषाढ शुद्ध दशमीला आम्ही सर्व खापरे मंडळी घरोघरी करीत असतो. याच एका पुण्याईच्या भरंवशावर आपलेपाशी एक मागणे आहे. काकाजी, आता जरी आपण सर्व भक्त मंडळी मोठ्या महाराजांच्या सेवेत निमग्न असाल; तरी आम्हां सर्व खापरे परिवारातील आपल्या लेकरांना तसेच सर्व सांप्रदायिक मंडळीला आपले प्रेम व आपल्या जवळ आश्रय द्यावा आणि महाराजांच्या सेवेत सहभागी करून घ्यावे एवढीच आमची कळवळून प.पू. श्रीमहाराज व आपण सर्व मंडळींचेचरणी विज्ञापना आहे.

***- मुरलीधर दत्तात्रय खापरे***

नागपूर

दि- १५-१०-२००२

---

काकाजी, रात्री हे पत्र लिहून पूर्ण झाल्यावर झोपलो. त्यावेळी मला झोपेत स्वप्न पडले आणि त्यात पूज्य श्रीबाबाजीमहाराजांचे व तुमचे अलग अलग दर्शन झाले. हा या प्रकाशनाला आशीर्वादच लाभला, असेच मला वाटते.असो !

श्री मोठे महाराज, श्रीबाबाजीमहाराज व इतर भक्त मंडळीस साष्टांग दंडवत ! - मु. द. खापरे

# परिस-स्पर्श

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥

आदरणीय भाऊसाहेबजींनी मधुराद्वैताचार्यांच्या अमूल्य रत्नावलीतील एकेक सूक्ति-रत्न निरखून पाहिले आणि माधुर्यमधुकोष निर्माण केला. त्यातील अफाट विषयांची विविधता पाहून मन आश्चर्याने थक्क होतं. यात केवळ विषयांची सूचि नसून, श्रीगुलाबरावमहाराजांनी ज्या ज्या विषयांना स्पर्श केला, त्या त्या विषयांचे अनेक पैलू उलगडून दाखविलेले आहेत, आणि तेही केवळ एकेका वाक्यात ! या मधुकोषातील असंख्य विषयांची मार्मिकता, सूक्ष्मता आणि व्यापकता पाहून या माधुर्यसागरात अखंड डुंबतच रहावं- त्यातून बाहेर येऊच नये, अशी ओढ निर्माण होते.

याचे कारण, भाऊसाहेबजींनी गुरुकृपेच्या बळावर गुरुमुखातील शब्दांचा अर्थ जाणला, स्वतः तो अनुभवला आणि **''ये हृदयीचं ते हृदयी''** घालण्यासाठी ज्ञान-भक्तीचं आवारच उघडून दिलं.

पस्तीस वर्षांपूर्वी माझ्या पीएच.डी.च्या प्रबंधासाठी गुरुवर्य श्री.मा.कुळकर्णी यांनी मला आराखडा करून दिला. नंतर आदरणीय कै. भाऊ घुईंनी मधुकोषाचे हस्तलिखित मला दिलं, आणि जणुंकांही त्याच क्षणी मी उत्तीर्ण झालो.

प्रबंधातील विषय मोठ्या महाराजांच्या ग्रंथातून शोधून काढणे- त्यांचा संदर्भासहित अर्थ समजावून घेणे- आणि त्या त्या विषयांचीव्यवस्थित मांडणी करणे; अशा तीन पायऱ्या होत्या. पैकी पहिल्या दोन पायऱ्यांवरून जणुंकाही भाऊसाहेबजींनीच मला कडेवर उचलून नेलं. आणि तिसरी पायरी चढण्यासाठी- मी फक्त विषयानुसार मांडणी केली आणि जणुंकांही सांप्रदायिक वारसाहक्कानं मला पीएच.डी. मिळाली आणि **''मूर्खोऽपि पण्डितायते''** या सुभाषिताची सार्थकता मला जाणवली.

हा ग्रंथराज प्रकाशित करून खापरे कुटुंबियांनी आपलं पितृऋण आणि तर फेडलंच पण त्यासोबत उदार अंतःकरणाने महाराजांचा अभ्यास करण्याची इच्छा असणाऱ्यांना सुवर्णसंधी प्रदान केली.

तीस चाळीस वर्षे खपून भाऊसाहेबजींनी या ज्ञानाच्या महासागराचे मनोहारी दर्शन घडविले. त्यामुळे पुढील काळात यातून काही काही रत्ने उचलून माझ्यासारखे असंख्य रत्नजडित होतील आणि महाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचं विविध अंगांनी दर्शन घडवत राहतील, यात शंकाच नाही.

आर्यांच्या वैभवशाली संस्कृतीचं पुरातनत्व, सर्वस्पर्शित्व आणि सर्व ज्ञानक्षेत्रातील सर्वश्रेष्ठत्व श्रीगुलाबरावमहाराजांनी आपल्या सर्व वाङ्मयातून मांडले एवढेच नव्हे तर ते सारं समन्वयसूत्रात गुंफले. ते सारेसंपुटीत (नटशेल-मधे) बघावयाचे असेल आणि समजून घ्यावयाचे असेल तर या मधाच्या पोळीतील एकेका चिमुकल्या कोषातलं मधु प्राशन करणं अणि तृप्त होऊन जाणं, एवढंच आपल्याला करावयाचं आहे !

असो. श्रीमहाराज एका अभंगात म्हणतात -

**असणियाहूनि दाखविणे सोपे ।**
**मज तुझ्या कृपे साधले ते ॥**

मधुकोषाच्या भरंवशावर मला मात्र 'असण्यापेक्षा दाखविणं' साधलं एवढं मात्र खरं !

*- कृ. मा. घटाटे*

*॥ श्रीमत्सद्गुरु श्रीबाबाजीमहाराजार्पणमस्तु ॥*

⊙

# श्रीगुरुंची प्रथम भेट

१९०५ साल असेल. श्री.भाऊसाहेबजी खापरे हे महाल विभागातील शिरपूरकर यांच्या घरी राहात होते. नागपूरला आल्यावर चंद्रपूर येथील त्यांचे शालेय मित्र श्री.नारायणराव पंडित हे त्यांच्यासवे राहू लागले. पुढे पंडितांची मावस बहीण व वणी येथील श्री. यशवंतराव साल्पेकरांची कन्या हिच्याशी भाऊसाहेबांचा विवाह झाल्यामुळे दोघांची मैत्री नात्यात परिवर्तित झाली व उत्तरोत्तर घनिष्ठच होत गेली.

दोघांही मित्रांना लहानपणापासूनच अध्यात्माची आवड होती. कीर्तनकारांची कीर्तने, प्रवचनकारांची प्रवचने ऐकण्याकडे दोघांचाही कल होता. कोणत्याही सत्पुरुषाची ख्याती कानावंर पडली की हे दोघेही त्वरित त्यांच्या दर्शनास जात. पंडित घराण्यात दत्तोपासना होती. त्यामुळे घरात श्रीगुरुचरित्राची पारायणे होतच असत. पंडितांनी श्रीगुरुचरित्राची अनेक परायणे केली. त्यात वर्णिलेला शिवमहिमा वाचून त्यांनी शिवपूजन आरंभिले. इकडे अनेक साधुपुरुषांची दर्शने चालू होतीच. आपल्यास आपला सद्‌गुरु केव्हा भेटेल याची तीव्र ओढ लागून होती. अन् एक दिवस अवचित त्यांच्या पूर्वपुण्याईचा सोनियाचा दिवस उगवला ...

श्री भाऊसाहेबांचे थोरले बंधू बापूसाहेब हे नागपुरातील प्रसिद्ध संस्कृत पंडित श्रीनिवासशास्त्री हरदास यांचे स्नेही होते. हरदासांचे घर लागूनच होते. त्यामुळे शास्त्रीबुवोंच्या थोरले चिरंजीव बापुगडी यांच्याशी खापरे यांचा स्नेह लवकरच जुळला. पूर्वीची त्या दोघांची चांद्याची ओळख होतीच; आता दोघेही नागपुरात शेजारी असल्यामुळे एकमेकांकडे येणे-जाणे वाढणे स्वाभाविकच होते.

एकदा बापुगडींनी भाऊसाहेबांना - 'अमरावतीला केवलेंच्या वाड्यात श्रीगुलाबरावमहाराज हे सत्पुरुष आले असून, ते तरुण आहेत. जन्मांध आहेत; कोणतेही शालेय शिक्षण त्यांनी ग्रहण केलेले नाही. कुणबी समाजातील ते असून, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव अशा महान ग्रंथांवर विद्वत्तापूर्ण विवरण, निरूपण करतात,' अशी माहिती दिली. त्यांनी केलेले त्या सत्पुरुषाचे वर्णन ऐकून भाऊसाहेबांना 'हे कोणीतरी शुकाचार्यांसारखे थोर महात्मे असावेत' असे वाटले, पण त्यांनी यापूर्वी कांही भोंदू साधूंना बघितले होते, त्यामुळे ते यांच्या दर्शनार्थ अमरावतीस जाण्यास तयार नव्हते. बापुगडींनी फार आग्रह केला पण भाऊसाहेबांनी त्यांना स्पष्ट नकार दिला. पुढे मुळेमास्तर हे नील सिटी हायस्कूल येथे नोकरीसाठी नागपूर येथे आले असता बापुगडींनी भाऊसाहेबांना त्यांच्याकडे नेले व मुळेमास्तरांजवळील त्या थोर महात्म्याच्या निरूपणाची टिपण-वही दाखविली, पण ती वाचूनही त्यांनी आपला अमरावतीस न जाण्याचा विचार बदलला नाही.

नंतर एकदा पंडित व भाऊसाहेब हे नागपूरला एकत्र राहात असताना बापुगडीचे खापरेंना पत्र आले. त्यात त्यांनी ''श्रीगुलाबरावमहाराज, हे नागपूरलाच चिटणविसांच्या वाड्यात उतरले आहेत. तेव्हा आतां तरी तूं त्यांच्या दर्शनासाठी अवश्य जा'' असे लिहिले. भाऊसाहेबजींनी पंडितांना श्रीमहाराजोंचे संपूर्ण वर्णन करून माहिती दिली. तेव्हा दोघाही मित्रांनी दर्शनास जाण्याचे ठरविले.

'स्वामी दत्तात्रये घेऊनिया सवें । नेले प्रेमभावें संतगृही ॥'

वेळ संध्याकाळची होती.

पंडित अन् खापरे चिटणीसांच्या वाड्यात पोहोचले, तेव्हा कळले की महाराज निजले आहेत.

महाराजांची ज्ञानेश्वरीवर प्रवचने होत असल्यामुळे त्यांच्या आगमनाची वार्ता साऱ्या नागपूरभर पसरली होतीच. दर्शनार्थी लोकांचे थवेच्या थवे येतच होते. अन् इकडे महाराज तर निजून होते.

निद्रेच्या मिषाने महाराज उत्कंठा वाढवीत होते.अन् दोघेही मित्र दर्शनासाठी थांबून होते.

तहानेल्या चातकाकडे कृपामृताचा मेघ केव्हा वळेल याची वाट पाहात होते.

त्यांचाही निश्चय होता की दर्शन घेतल्याविना परतायचेच नाही.

हळूहळू दर्शनार्थ आलेले लोक तसेच परतून गेले.

संध्याकाळ संपली, रात्र झाली, मध्यरात्र झाली अन् महाराज जागे झाले.

शिष्याला हाक मारली. स्नानासाठी पाणी काढावयास सांगितले. स्नान आटोपले. महाराज पूजेला बसले. ज्ञानराजांची अन् भगवान् कृष्णाची षोडशोपचारे पूजा केली.

त्यानंतर उत्तररात्री या दोघांची आस्थेने विचारपूस केली.

त्यांची ती मंजुळ अन् भुरळ पाडणारी वाणी ... कोवळं वय ... मोहक रूप ... अन् त्या कोवळ्या वयात असलेलं अलौकिक पांडित्य ... या साऱ्यांनी दोघेहि मोहून गेले. घरी परतताना सुद्धा दोघांना श्रीमहाराजांचे सारे गुण आठवू लागले. मन आनंदसागरात डुंबत होते.

घरातील परिस्थितीमुळे काही काळ सरकारी नोकरी करून, पुन्हा विद्यार्जनास पंडितांनी प्रारंभ केला होता, पण ओढ मात्र महाराजांच्या सहवासाची लागली.

ते कधी आपल्याला जवळ करतील, हीच एक आर्त होती.

एके दिवशी भाऊसाहेबांच्या सह महाराजांच्या दर्शनास गेले असताना महाराज भोजन करीत होते. तोच अमरावतीहून पत्र आले. कुणीतरी शिष्याने ते पत्र महाराजांना वाचून दाखविले. 'नाना कविमंडन अत्यासन्न आहेत. ते आपल्या दर्शनाची वाट पाहात आहेत.' हे वाक्य कानी पडतांच महाराज भरल्या ताटवरून ताडकन् उठून, जेवण टाकून अमरावतीला निघाले.

शिष्याच्या नुसत्या एका पत्राने त्याच्या भेटीसाठी, भरले ताट सोडून निघालेल्या त्या गुरुमाउलीच्या पाठमोऱ्या जाणाऱ्या मूर्तीकडे पंडित अनिमिष नेत्राने, भरल्या अतःकरणाने बघतच राहिले. प्रेमाचं असं उत्कट रूप वाचलं होतं, पण बघितलं नव्हतं- अनुभवलं नव्हतं. शिष्याकरिता पानावरून उठणाऱ्या सद्‌गुरूतच पंडितांना हंसपक्ष्यांसाठी जेवणातला घास सोडून धावत सुटणारा द्वारकेचा राणा दिसला.

आता तर पंडितांचं मन महाराजांकडेच ओढलं जाऊ लागलं होतं. परिमळाची धाव भ्रमरांना ओढते तशी ही ओढ.. शब्दातून व्यक्त न होणारी ... लेखनातील अक्षरातून न साकारणारी ...

**ज्ञानेश्वरकन्या देखिली लोचनी । फिटली पारणीं इंद्रियांची ॥**
**दत्त उपासना फळली मजसी । सद्‌गुरुपदासी दाऊनिया ॥**
**स्वामी दत्तात्रय अत्रीचा नंदन । करीत विंदान मायबाप ॥**
**मित्राचिया रूपें येऊनि बोधिले । भाग्य उदेले तुझे बापा ॥**

असो. हरिभाऊ केवलेंचे पत्र खापरे यांना आले. त्यात शुक्लेश्वर वाठोडा येथील कात्यायनी व्रतासाठी निमंत्रण होते. ते पत्र खापरेंनी पंडितांना दाखविले.

**'निरोप आला स्वामी दत्तात्रया । अवश्यचि या उत्सवातें ।**

त्यांनी खापरेंना **'यावेच'** असे लिहिले होते. ती अक्षरे पाहून 'आपणहि गेलेच पाहिजे' अशी पंडितांनाहि ओढ लागली आणि खापरे आणि वर्धेचे भाऊसाहेब देशपांडे यांचे सोबत ते वाठोड्यास गेले.

अगोदरच एकादशीचा पर्वकाळ- त्यात संत सहवा- आणि सोबत प्रेमळ अशी गुरुवर्णन ! या त्रिवेणीतील पवित्र स्नानाचा अवर्णनीय असा तो प्रेयस अनुभव !

कात्यायनीच्या व्रताची सांगता होती. यजमान स्वतः श्रीगुलाबरावमहाराज होते. यज्ञविधीच्या जाणकार ब्रह्मवृंदाने सर्व कर्म यथासांग पूर्ण केले. वाणीही ज्या आनंदमय सोहळ्याचे वर्णन करण्यास असमर्थ ठरावी असा तो अमृतोत्सव आटोपला. पंडित-खापरे आदी मित्रमंडळी नागपूरला निघाली.

परीक्षा जवळ आली होती म्हणून जाणे जरूर होते.

निरोप घेण्यास ही मंडळी गेली. त्यावेळी श्रीमहाराजांची पयोष्णीच्या वाळवंटात बऱ्याचशा मंडळींसोबत विविध विषयांवर ज्ञानचर्चा चालू होती. ती ऐकत हे तिघे तिथेच थांबले. थोड्या वेळाने ठरवलेला गाडीवान त्या ठिकाणी आला व चलण्याची घाई करू लागला. पण यांची पावलं निघत नव्हती. तो गाडीवाला जास्तच गडबड करू लागला. तोंच महाराज म्हणाले,

'चला उठा, जा इथून'

असे म्हटल्याबरोबर नारायणराव पंडितांच्या डोळ्यांत टचकन पाणी आले.

महाराज मोठ्या प्रेमाने म्हणाले, 'अरे, असा काय रडतोस ?'

'महाराज तुम्ही आम्हाला दूर लोटीत आहात.'

महाराजांनी समजूत घातली अन् दोघेही मित्र नागपुरास परतले.

ही गुरुशिष्यांच्या परस्परांवरील अनंत काळच्या अतूट प्रेमाची चाहूल होती. आर्ततेची कळी नुकतीच कुठे उमलत होती, अजून फुलायची होती, बहरणार होती अन् तिचा सौरभ दशदिशांत तरळणार होता.

पंडितांना वाटले गुरुचरित्राचे पाठ सार्थकी लागले. आपल्या मित्राच्या म्हणजे खापरेंच्या रूपाने प्रत्यक्ष अत्रीनंदन दत्तात्रेयांनीच कृपा केली. अन् आपल्यास सद्गुरु-आईचे चरण दाखवून दिले..

कात्यायनी व्रताहून परतल्यावर तर नागपुरात दोघांचेही मन रमेना. कामधाम सुचेना.

दिवस-रात्र आठवण येई ती सद्गुरु आईची.

विरंगुळा म्हणून खापरेंनी पंडितांना आपल्या खेड्यावर नेलं.

तेथे दोघांनी श्री ज्ञानराजांची कृपा व्हावी म्हणून हरिपाठाचे पाठ केले.

**नागपुरास –**

तोंच काही दिवसांनी महाराज नागपूरला आले. वृत्त कळताच पंडितांना त्यांच्या दर्शनाची अनिवार इच्छा झाली. त्यांनी आपल्या कचेरीतील वरिष्ठ अधिकाऱ्याला 'मी आजचे दिवस कामावर येऊ शकत नाही' अशी चिठ्ठीच धाडून दिली. जेवणही न घेतां ते तसेच खापरेंचे सोबत श्रीमहाराजांचे दर्शनास गेले. महाराज श्रीनिवासशास्त्रींच्या भेटीस निघाले होते. दोघेही तिथेच गेले. एक-दोन दिवस महाराजांचे हरदासांकडे वास्तव्य होते.

एके दिवशी महाराज यांना म्हणाले, 'आम्हांला एक घर पाहा. काही दिवस इथेच राहू.'

'महाराज, आपण आमच्याचकडे संकोच न करता राहावे' खापरेंनी महाराजांना आग्रह केला. खापरे आणि दोघे पंडितबंधू असे तिघे एकत्र राहिले.

महाराज त्यांच्याकडे वास्तव्यास आले. पुढे मातोश्री रंगुताईलाही तिथेच बोलावून घेतले. त्यामुळे साऱ्यांच्या भोजनाची व्यवस्था झाली.

आपले सर्वच वेतन पंडित सद्गुरुसेवेसाठी खर्च करीत. त्यांचे बंधू आबाजीही आपला पगार सद्गुरुसेवेसाठी खर्चू लागले. भाऊसाहेबांनीहि बाकीचा आर्थिक भार सांभाळला.

महाराज आपल्या मंडळींना म्हणत,'तुम्ही जेवणासाठी इतरांच्या घरी जात जा. ताई देवाचा नैवेद्य करून येथेच प्रसाद घेत जाईल.'

नव्या नव्हाळीचे संतसहवासाचे ते सोनियाचे अपूर्व दिवस कसे संपले, ते कळलेच नाही.

(डॉ. राम पंडित लिखित 'ऱ्हीं नारायणाय नमः ऱ्हीं - या श्रीबाबाजीमहाराजांच्या चरित्राच्या आधाराने)

⊙

# श्रीमहाराजांच्या जीवनाचा आलेख

* **व्यावहारिक नांव : ''गुलाब गोंदुजी मोहोड''**
* **नाथसंप्रदायानुसार नांव : ''पांडुरंगनाथ''**
* **माता-पिता :** श्री गोंदुजी व सौ. अलोकाबाई मोहोड.
* **माधान,** जि. चांदुरबाजार, जि. अमरावती, विदर्भ.
* **जीवन काल :** इ. स. १८८१ ते १९१५.
* **६ जुलै १८८१ :** आषाढ शु. १०. अमरावतीजवळ लोणीटाकळी येथजन्म.
* नवव्या महिन्याचे असताना अंधत्व * वयाची पहिली चार वर्षे माधानला वास्तव्य.
* **इ. स. १८८५** : मातृवियोग
* त्यानंतरची सहा वर्षे आजोळी-लोणीटाकळीला वास्तव्य.
* या काळात प्रज्ञाचक्षुत्वाचा प्रत्यय.
* यांनतरचा इ. स. १९०० पर्यत माधानाच्या घरी वास्तव्य. या काळात दैवी गुणांचा उदय आणि सर्वज्ञतेचा परिचय. लोकांकडून ग्रंथ वाचवून घेण्यासाठी आत्यंतिक परिश्रम.
* **इ. स. १८९२ :** विवाह. पत्नी : **सौ. मनकर्णिका.**
* **इ. स. १८९७ :** पासून निबंध व अभंगांची रचना, आनंदमार्ग खंडन. पितृवियोग
* **इ. स. १९०० :** बालसवंगड्यांना अनुग्रह सिरसगाव, चांदूरबाजार, यावली इत्यादी ठिकाणी लोकोद्धारासाठी भ्रमंती. घरच्या विषप्रयोगादि कटकटींना कंटाळून आणि पाटीलकीवर पाणी सोडून गृहत्याग..
* **इ. स. १९०१** : श्रीज्ञानेश्वरमाउलीचा साक्षात् अनुग्रह.
* **इ. स. १९०२ :** ग्वाल्हेरचे स्वानंदसाम्राज्यकर्ते श्रीमंत जठार यांना पत्र. त्यात *मानभावमत समीक्षा, *डार्विन मतसमीक्षा, स्पेन्सरमत समीक्षा *स्त्रीगीते, ओव्या, झोपाळ्यावरील व जात्यावरील लोकगीतांची रचना. * पंढरपूर यात्रा. * अमरावतीला आगमन. * हरिभाऊ केवले या शिष्योत्तमाची भेट.
* **इ. स. १९०३ :** कात्यायनी व्रताचा आरंभ. देउरवाडा
* **इ. स. १९०४ :** पूर्वजन्म- गुजरातेतील झुंझुरवाडा येथील सत्पुरुष बेचरानंदस्वामीसंबंधी संस्मरण. *आर्वीचे सत्पुरुष दामोदर आपाजी महाराजांची भेट. *ज्ञानेश्वरीच्या निरूपणास आरंभ- *ज्ञानेश्वरीतील उपलब्ध प्रतीत नसलेली ओवी सांगितली. *माधुर्यामृतसागरास भरती, * विविध विषयावर निरूपणे, बालसवंगडी व प्रथम शिष्य असलेल्या रामचंद्रबापूंना मृत्युसमयी - दिलेल्या सूचना. * आळंदीवारीचा आरंभ. * स्त्रीव्रतांचा आरंभ. * रुक्मिणी स्वयंवराची रचना.
* **इ. स. १९०५ :** महाराजांचा श्रीकृष्णाशी विवाह. *श्रीकृष्णमूर्ती व ज्ञानेश्वरमाउलीच्या पादुकांची प्राप्ति. *नित्यपूजा. *प्रियशिष्य आणि उत्तराधिकारी नारायण पंडितांची भेट.
* मुलगा-अनंत यांचा जन्म. * ल. रा. पांगारकरांची व लोकनायक बापूजी अणे यांची भेट.
* **इ. स. १९०७ :** नागपूर येथे ज्ञानेश्वर मुद्रणालयाची स्थापना, व ग्रंथछपाईला आरंभ.
* जगदीशचंद्र बोसांच्या ग्रंथांची समीक्षा. * कलकत्ता येथे प्रा. प्रियनाथ मुकर्जीकडे मुक्काम.
* जगन्नाथपुरीयात्रा. * मायर्सच्या ग्रंथाची समीक्षा. * योगप्रभाव निरूपणे. चित्तोपदेश व सद्वैजयंतिरचना. * शिवपार्थिवपूजनाचा आरंभ. * प्रियलीलामहोत्सवादि ग्रंथांची रचना.
* **इ. स. १९०९ :** अंतर्विज्ञानसंहिता, * अलौकिक व्याख्यानमालादि ग्रंथ-रचना. *वृन्दावनाची यात्रा.
* **इ. स. १९१० :** डॉ. मुंजेना पत्र, * न्याय वैशेषिकातून भौतिक विज्ञानासंबंधी मार्गदर्शन. *साहित्यसम्राट न. चि. केळकरांशी भेट.
* **इ. स. १९११ ते १९१३ :** विविध विषयांवर पत्रे, लेख व अनेक ग्रंथांची निर्मिती.
* **इ. स. १९१४ :** श्रीनिवृतिनाथांचा दृष्टांत, *देवासच्या राजांशी पत्रव्यवहार व देवासभेट. *संगीतकार पं. भातखंडेशी चर्चा व गानसोपानाची रचना. *धुळ्याचे सत्पुरुष बाबा गर्दे यांची भेट.
* **इ.स. १९१५ - २० सप्टेंबर :** भाद्रपद शु. १२, पुणे मुक्कामी चाकण ऑइलमिलच्या परिसरातील घरातून महाप्रयाण.

- इति ॥

# कार्याचा आलेख

* नाव : श्रीगुलाबरावमहाराज अर्थात् गुलाब गोंदुजी मोहोड. इ. स. १८८१ ते १९१५.
* नवव्या महिन्यात अंधत्व
* गोपीभाव : ज्ञानेश्वकन्या आणि कृष्णपत्नी.
* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* भगवद्विग्रहाचे अनध्यस्तविवर्तत्व : वेदान्तातील नवीन परिभाषा.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदाचे प्रतिपादन.
* धर्म आणि तत्वसमन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्व मीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्यतत्त्वज्ञानांची भारतीयसिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन. त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादासंबंधी तौलनिक विवेचन.
* लो. टिळक, विवेकानंद, रामतीर्थ वगैरेंच्या काही मतांची परखड चिकित्सा.
* बुवाबाजीचा दंस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांब समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.
* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांचे षड्दर्शनानुसार प्रस्तुतीकरण.
* इतिहास कोणी कसा लिहावा आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा याचे मार्गदर्शन.

* आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे या ऐतिहासिक सिद्धांतांचे मुद्देसूद प्रतिपादन. व लो. टिळकांच्या उत्तरधृवीय मताचा परामर्श.
* तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती या ऐतिहासिक सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूतविचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना,भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* 'प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता' हे आधुनिक संकेत संत किंवा आर्ष वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्व-उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश.
* स्त्रियांसाठी खास गीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन.
* नाटक लेखन.
* आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीचा उपाय : मोक्षपट.
* संस्कृत- ३०, हिंदी- ३, मराठी १००, वऱ्हाडी आणि व्रजभाषेतून एकूण सवाशेहून अधिक ग्रंथांची रचना.
* अभंग - २०९९,
* पदे - २२५२,
* गीतरचना - १२५०,
* श्लोक – १०००,
* ओव्या - २३०००,
* एकूण पृष्ठे अंदाजे ६०००.

# श्रीगुलाबरावमहाराजांची ग्रंथसंपदा

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| | **सूत्रग्रंथ** | |
| १. | अन्तर्विज्ञानसंहिता | (सं) य १६ |
| २. | ईश्वरदर्शनम् | (सं) य १६ |
| ३. | समसूत्री | (सं) य १६ |
| ४. | दुर्गातत्त्वम् | (सं) य १६ |
| ५. | काव्यसूत्रसंहिता | (सं) य १६ |
| ६. | शिशुबोधव्याकरणम् | (सं) य १६ |
| ७. | न्यायसूत्राणि | (सं) य १६ |
| ८. | एकादशीनिर्णयः | (सं) य १६ |
| ९. | पुराणमीमांसा | (सं) य १६ |
| | **आकर ग्रंथ** | |
| १०. | संप्रदाय सुरतरु, (भा.१ व २) | ११ |
| | **भाष्यग्रंथ** | |
| ११. | नारदीयभक्त्यधिकरण-न्यायमाला | (सं) य १६ |
| १२. | भक्तिसूत्रभाष्यम् | (सं) य १६ |
| १३. | भक्तिसूत्रभाष्यम् भाष्य | (सं) य १६ |
| १४. | प्रियलीलामहोत्सव (भागवतभाष्य) निमंत्रणविलास | य १४ |
| १५. | प्रियलीलामहोत्सव- आमंत्रणविलास | य१४ |
| १६. | श्रीधरोच्छिष्टपुष्टिः | (सं) य १६ |
| १७. | श्रीधरोच्छिष्टपुष्टिलेशः | (सं) य १६ |
| १८. | ब्रह्मसूत्रव्याख्या | य १५ |
| १९. | निगमांतसुभा | य १५ |
| २०. | ब्रह्मसूत्रांवर निरूपणे | य १८ |
| २१. | भगवद्गीतासंगति | य १ |
| २२. | मनोहारिणी (हिन्दी गीताप्रवचन) | य १८ |
| २३. | गीतेवरील निरूपणे | य १७ |
| २४. | गीतेवरील प्रवचने | य १७ |
| २५. | गीतेवरील निरूपणे | य १८ |
| २६. | गीतेवरील स्फुट निरूपणे | य १८ |
| २७. | ऐश्वर्यार्थदीपिका (ईश्वरगीता) | य १५ |
| २८. | षट्पदध्वनिः | (सं) य १६ |
| २९. | ईशावास्योपनिषद् | (सं) य १६ |
| ३०. | ऋग्वेदटिप्पणी | (सं) य १६ |
| ३१. | चौष्टी | य १ |
| ३२. | चिरंजीवपदाभ्यास | य २ |
| ३३. | बालवासिष्ठ | (सं) य १६ |
| ३४. | योगवासिष्ठ तत्त्व | य १७ |
| ३५. | योगवासिष्ठ निरूपणे | य १८ |
| | **शास्त्रग्रंथ** | |
| ३६. | सुखवरसुधा | य १३ |
| ३७. | वेदान्तपदार्थोद्देशदीपिका | य १३ |
| ३८. | शास्त्रसमन्वयः | (सं) य १६ |
| ३९. | आगमदीपिका | (सं) य १६ |
| ४०. | युक्तितत्त्वानुशासनम् | (सं) य १६ |
| ४१. | प्रेमनिकुंज | य १० |
| ४२. | शांतिसुधाकर | य २ |
| ४३. | वेदान्तप्रक्रियासमुच्चय | य १५ |
| ४४. | वेदान्तनिरूपण | य १५ |
| ४५. | तत्त्वबोधः | (सं) य १६ |
| ४६. | षड्दर्शनलेशसंग्रहः | (सं) य १६ |
| | **भक्तिग्रंथ** | |
| ४७. | भक्तिपदतीर्थामृत (तत्त्वमसि) | य १ |
| ४८. | निगमांतपथसंदीपक | य १ |
| ४९. | भगवद्भक्तिसौरभ | य २ |
| ५०. | प्रीतिनिर्तन | य २ |
| ५१. | नित्यतीर्थ | य २ |
| ५२. | प्रिय पाहुणेर | य २ |
| ५३. | भक्तितत्त्वविवेक | (सं) य १६ |
| ५४. | प्रियप्रेमोन्माद | (सं) य १६ |
| ५५. | गोपिकापादपीयूषलहरी | य १५ |
| ५६. | गोविंदानंदसुधा | (सं) य २ |
| | **योग** | |
| ५७. | निदिध्यासनप्रकाश | य १ |
| ५८. | ध्यानयोगदिवाकर | य २ |
| ५९. | सोपानसिद्धि | य २ |
| ६०. | हिरण्ययोग (स्वप्नयोग) | स १५ |
| ६१. | योगांगयमलक्षण | य १५ |
| ६२. | योगप्रभाव (पद्य) | य १५ |
| ६३. | योगप्रभाव १-२ (गद्य) | य १९ |
| ६४. | ज्ञाने.कुंडलिनी०। निरूपण. | य १५ |
| | **सांख्य** | |
| ६५. | सांख्यसुरेंद्र | य १४ |
| ६६. | सांख्यतत्त्व सूत्रावरील विचार | य १५ |
| ६७. | सांख्यसार एक निबंध | य १५ |
| ६८. | सांख्यसार | य १८ |
| | **संगीत** | |
| ६९. | छंद प्रदीप | य १५ |
| ७०. | गानसोपान | य १५ |
| | **आयुर्वेद** | |
| ७१. | मानसायुर्वेद | (सं) य १६ |
| ७२. | मानसायुर्वेद | (मराठी) य १५ |
| ७३. | मिषगिंद्रशचीप्रभा | (सं) य १६ |
| ७४. | वैद्यवृंदावन | य १५ |
| | **प्रकरणग्रंथ** | |
| ७५. | स्वमतनिर्णयः | (सं) य १६ |
| ७६. | संप्रदायकुसुममधु | (सं) य १६ |
| ७७. | सच्चिन्निर्णयः | (सं) य १ |
| ७८. | कांतकांतावाक्यपुष्पम् | (सं) य २ |
| ७९. | चित्तोपदेश | य २ |
| ८०. | सद्वैजयंती | य २ |
| ८१. | बाराखडी | य २ |
| ८२. | त्रिकांडसार | य २ |
| ८३. | प्रमादकल्लोळ | य १५ |
| | **गाथा** | |
| ८४. | अभंगांची गाथा | य ९ |
| ८५. | पदांची गाथा | य ९ |
| | **निबंध** | |
| ८६. | अलौकिक प्रवास | य २ |
| ८७. | अमोघनिरूपण | य २ |
| ८८. | बौद्ध निबंध | य १५ |
| ८९. | वेदान्तनिरूपण | य १५ |
| ९०. | सिद्धिसार | य १५ |
| ९१. | अलौकिकाख्यानमाला | य ५ |
| ९२. | युक्त्या | य १७ |
| ९३. | गुरुचरणकौमुदी | य १८ |
| ९४. | निरूपण | य १७ |
| | **संवाद** | |
| ९५. | साधुबोध | य ८ |
| ९६. | मणिमंजुषा | य १२ |
| ९७. | सुवर्णकण | य १७ |
| ९८. | स्वमंतव्यांश-सिद्धान्ततुषार | य ६ |
| ९९. | दुर्महृदयभंजन | य १५ |
| १०० | प्रश्नोत्तरे | य १५ |
| १०१. | वृत्तिक्षीरसागर | य १५ |
| १०२. | बालबुद्धिविवर्धिनी | य १७ |
| | **पत्रे ११८** | |
| १०३. | अकरा पत्रे | य १ |
| १०४. | वीस पत्रे | य २ |
| १०५. | अडतीस पत्रे | य ७ |
| १०६. | सत्तेचाळीस पत्रे | य १२ |
| १०७. | एकपत्र | य १५ |
| | **लोकगीते** | |
| १०८. | स्त्रीगीते | य ४ |
| १०९. | स्त्रगीतसंग्रह | य ४ |
| ११०. | तुंबडी | य २ |
| १११. | रुक्मिणी स्वयंवर | य ९ |
| ११२. | रुक्मिणी पत्रिका | य ९ |
| | **स्तोत्रे** | |
| ११३. | ज्ञानेश्वर-मातृपितृ-भावनाष्टक | य २ |
| ११४. | कृष्णपंचपदी | य २ |
| ११५. | गुरुपंचपदी | य २ |
| | **चरित्र - आख्याने** | |
| ११६. | आत्मचरित्र | य १५ |
| ११७. | सूचना प्रकरण | य १ |
| ११८. | सूचना प्रकरण | य २ |
| ११९. | अभंगात्मक १९ आख्याने | य ९ |
| १२०. | पदात्मक ७ आख्याने | य ९ |
| १२१. | पतिव्रताचरितामृत | य १५ |
| | **विविधरचना** | |
| १२२. | सुखपर्व (नाटक) | य १५ |
| १२३. | मात्रामृतपानम् | (सं) य १६ |
| १२४. | पत्नीप्रेमपराग | (चरित्र) |
| १२५. | नवीन भाषा - 'नावंग' | य १६ |
| १२६. | शब्दकोष | य १५ |
| १२७. | सांकेतिक भाषा (लघुलिपी) | य १५ |
| १२८. | मोक्षपट (क्रीडा) | य १५ |
| १२९. | हरिपाठाच्या प्रतिज्ञा | य १५ |
| १३०. | हरिपाठाचा अर्थक्रम | य १५ |
| १३१. | मायर्सवर टीपा | य १५ |
| १३२. | शिक्षणरत्नाकर (अप्रकाशित) | (चरित्र) |
| १३३. | ज्ञानपाठ (१६ अभंग) | य ९ पू. |
| १३४. | गायत्रीमंत्र अन्वयार्थ | य १ |

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

# मधुकोष-प्रकाशनातील सहभाग

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. माधव दत्तात्रेय खापरे | ७५००/- | पुत्र | वर्धा |
| २. | सौ. चित्राबाई माधव खापरे | ७५००/- | सून | वर्धा |
| ३. | श्री. पुरुषोत्तम रामचंद्र खापरे | ३०००/- | नातू | सेवाग्राम |
| ४. | श्री. रविंद्र लक्ष्मण खापरे | ३०००/- | ″ | नागपूर |
| ५. | श्री. मोहन मनोहर खापरे | ३०००/- | ″ | नागपूर |
| ६. | श्री. गोविंद मनोहर खापरे | ३०००/- | ″ | भोपाळ |
| ७. | श्री. घनश्याम मुरलीधर खापरे | ३०००/- | ″ | मुंबई |
| ८. | श्री. मधुकर यादव खापरे | ३०००/- | ″ | भंडारा |
| ९. | श्री. दिलीप गणपत खापरे | ३०००/- | ″ | नागपूर |
| १०. | श्री. उपेंद्र लक्ष्मएराव खापरे | ३०००/- | ″ | नागपूर |
| ११. | श्रीमती उमाबाई पुरुषोत्तम देशपांडे | २०००/- | मुलगी | यवतमाळ |
| १२. | श्री. सुरेश पुरुषोत्तम देशपांडे | ३०००/- | नातू | मुंबई |
| १३. | सौ. सुलभा मोरेश्वर बक्षी | २०००/- | नात | इंदौर |
| १४. | सौ. शशीकला वसंत उद्दनवाडीकर | २०००/- | ″ | नागपूर |
| १५. | सौ. विजया दाभाडकर | १००१/- | ″ | नागपूर |
| १६. | सौ. माधुरी अरुण देशपांडे | २०००/- | ″ | यवतमाळ |
| १७. | सौ. मेधा मोहन वऱ्हाडपांडे | २०००/- | ″ | नागपूर |
| १८. | सौ. निलीमा उदय बोरावार | २०००/- | ″ | गडचिरोली |
| १९. | सौ. अरुंधती पंकज कापदेव | २०००/- | ″ | दिल्ली |
| २०. | सौ. शुभदा श्रीपाद भट्टलवार | २०००/- | ″ | भद्रावती |
| २१. | सौ. नंदा शरद मुऱ्हेकर | २०००/- | ″ | परतवाडा |
| २२. | सौ. हिरा प्रभाकर मोहरीबब | २०००/- | ″ | नागपूर |
| २३. | सौ. माणिक विनय देव | २०००/- | ″ | नागपूर |
| २४. | सौ. स्वाती मकरंद बेगडे | ५०१/- | पणती | नागपूर |
| २५. | श्री. वसंतराव गणेशपंत देशमुख | ५०१/- | व्याही | नांदगाव |
| २६. | श्री सुधीर वसंतराव देशमुख | ५००/- | | नांदगाव |
| २७. | डॉ. सौ. प्रतिभा विश्वेश्वरराव नासेरी | २०००/- | नात | नागपूर |
| २८. | डॉ. सौ. मुक्ता प्रमोदराव उमरजी | २०००/- | नात | पुणे |
| २९. | डॉ. सौ. ज्योती अशोकराव बक्षी | २०००/- | नात | वर्धा |
| ३०. | सौ. कांता अरुणराव पुरेकर | २०००/- | नात | वर्धा |
| ३१ . | श्री. मुरलीधर दत्तात्रेय खापरे | २५,०००/- | पुत्र | नागपूर |

// श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ //

# // पांडुरंगनाथ जयंती //

*श्री पांडुरंगनाथ महाराजांचा जन्म वृषभ संवत्सरांत आषाढ शुक्ल पक्षांत झाला असून जन्म तिथि दशमी ही आता निश्चित केली आहे. इतर अवताराप्रमाणे श्रीकृष्ण परमात्म्याच्या ह्या चित्कलेच्या अवताराचे जयंतीचाही महोत्सव होणे इष्ट आहे. श्री महाराजांचे ठिकाणी अनन्यगतिक अशा आमच्या सर्व पूज्य बंधूंनी आषाढ शुक्ल दशमीस श्री. महाराजांचे पूजन करावे, त्यांचे चरित्रातील माधान प्रकरण दुसरा रज पृष्ठ २२ श्रीमहाराजांचा जन्मापासून पृष्ठ ३१ पर्यन्तची पृष्ठे (*) वाचावीत व यथाशक्ति नैवेद्य अर्पण करावा. हा दिवस श्री महाराजांच्या ग्रंथाचे वाचन, स्त्रीगीतांचे गायन व त्यांच्याच अभंग व पदांचे भजन करण्यांत घालवावा, अशी विनंती आहे.*

*(*आवृत्ति ४ थी, इसवी सन २००० पान १६ ते २४)*

*ह्यावर्षी आमचे येथे सामुदायिक उत्सव करण्याचे ठरविले आहे. तरी सर्व गुरुबंधुंनी आपले येथील वैयक्तिक उत्सव आटोपून सहकुटुंब सहपरिवारे ठीक सकाळी ८ वाजता येवून प्रसंगास शोभा आणावी. तेथे श्री भक्तिपदतीर्थामृत वगैरे ग्रंथांचे पाठ करून प्रसाद ग्रहण करावा ही विनंती !*

*(श्रीबाबाजीमहाराजांचे अनुमतीने)*

*आपला*

*चरणरजाभिलाषी*

*नागपूर. तारीख २१-६-१९३९* **- दत्तात्रय गणपतराव खापरे**

## श्रीगुलाबरावमहाराजांच्या सूक्तिरत्नावलीतील यष्टींच्या अनुसार उपलब्ध ग्रंथांची सूचि

**(यष्टि १)** (रु. ४०)
*भक्तिपदतीर्थामृत *निगमान्तपथसंदीपक *चौसष्टी *योगसाधनेची ११ पत्रे *भगवद्गीतासंगति, *निदिध्यासनप्रकाश (योग) *कान्तकान्तावाक्यपुष्पम् (संस्कृत) *सूचनाप्रकरण - १, *गायत्री-अन्वयार्थ

**(य २पूर्वार्ध)** (रु.४०)
*कृष्णपंचपदी, *सद्वैजयंती, *बाराखडी *चित्तोपदेश, *त्रिकांडसार, *तुंबडी, *चिरंजीवपदाभ्यास, *शांतिसुधाकर *सोपानसिद्धि, *नित्यतीर्थ *मणिमंजुषा *प्रियपाहुणेर *अलौकिकप्रवास *अमोघनिरूपण *स्त्रीगीत *श्रीज्ञानेश्वरक्षमापन स्तोत्र.

**(य २-उत्तरार्ध)** (रु. ५०)
*गुरुपंचपदी, *योगसाधनेची २० पत्रे *ध्यानयोगदिवाकर,*भगवद्भक्तिसौरभ *प्रीतिनर्तन, *गोविन्दानंदसुधा, *मातृपितृभावनाष्टक *सूचनाप्रकरण-२

**(य ३) प्रियलीलामहोत्सव**
आमंत्रणविलास- य ३
आगमनविलास - य १४

**(य ४)स्त्रीगीतसंग्रह** (रु. ३०)
*स्त्रीगीतसंग्रह (माधुर्यकल्लोळ)

**(य ५)** (रु.३०)
*अलौकिक व्याख्यानमाला
* **Blind Leads The Unblinds** (रु.६०)

**(य ६)** (रु. १०)
*स्वमंतव्यांश सिद्धान्ततुषार (हिंदी)

**(य ७)** (रु. ३०)
*पत्रे-५६ - योग, बुवाबाजी, धर्मसुधारक, धर्म, तत्त्वज्ञान, समीक्षा, भौतिक्विज्ञान, स्वजाति बांधवांना विनंती.

**(य ८) साधुबोध** (रु४०)
९३८प्रश्नोत्तरे

**(य९- पू )** *अभंगांची गाथा - २५०७.
**(य ९- उ)** *पदांचीगाथा - २५००
*हिंदी पदसंग्रह

**(य १०)** *प्रेमनिकुंज

**(य ११)** रु.१६०)
*संप्रदाय सुरतरू भाग १ व २

**(य १२)** (रु. ३०)
*पत्रे ६२ - संस्कृत / काव्यरूप / गद्य

**(य १३)** (रु. २०)
*सुखवरसुधा.
*वेदान्तपदार्थोद्देशदीपिका

**(य १४)**
गानसोपान,(रु.५०) सांख्यसुरेन्द्र (?)

**(य १५)** (रु. ४०)
*ईशावास्य *ज्ञानेश्वरीनिरूपण, *निगमान्तसुभा, *ऐश्वर्यार्थदीपिका, *ब्रह्मसूत्रव्याख्या, *सांख्यसूत्रे, *सांख्यनिबंध, *षट्पदध्वनि, *योगांगयमलक्षण, *योगप्रभाव (ओवीबद्ध), *हिरण्ययोग-स्वप्नयोग, *प्रमाद-कल्लोळ, *दुर्मतहृदयभंजन, *वृत्तिक्षीर-सागर, *प्रश्नोत्तरी, *वेदान्तनिरूपण, *सिद्धिसार, *वेदान्त प्रक्रिया समुच्चय, *बौद्ध निबंध, *सुखपर्व नाटक, *आत्मचरित्र, *पतिव्रताचरित्रामृत, *छंदप्रदीप, *नावंगभाषा,*सांकेतिक लघुलिपी, *स्वसमाज-नियम, समीक्षा, *मननार्थ गीता (पत्र) *खापरेंना पत्र

**(य १६) संस्कृत रचना भा १**(२०)
सूत्रग्रंथाः-
*अन्तर्विज्ञान-संहिता, *ईश्वरदर्शनम्, *समसूत्री, *दुर्गात्त्वम्, *काव्यसूत्रसंहिता, *शिशुबोधव्याकरणम्, *न्यायसूत्राणि, *एकादशीनिर्णयः, *पुराणमीमांसा, *आगमदीपिका, *शास्त्रसमन्वयः,*युक्तितत्त्वानुशासनम् *षड्दर्शनलेशसंग्रहः *तत्त्वबोधः

**(य १६) संस्कृतरचना भा. २** (५०)
*स्वमतनिर्णयः *संप्रदायकुसुममधु, *ऋग्वेदटिप्पणी, *सच्चिन्निर्णयः *गंगामृतपानम्, *भिषगींद्रशचीप्रभा *कांतकांतावाक्यपुष्पं*उच्छिष्टपुष्टिलेशः *श्रीधरोच्छिष्ट-पुष्टिः *संस्कृतपदानि *नारदीयभक्तिसूत्रभाष्यम् (अधिकरण-न्यायमाला) *गंगास्थितिनिणयः *भक्तिभाष्य, *मानसायुर्वेद.

**(य १७) समयोपदेश** (सुबोधहिंदुधर्म)
*गीता निरूपणे *योगवासिष्ठ निरू. *ब्रह्मसूत्र निरूपणे *बोधवाक्ये *सुवर्णकण, *पंचदशी निरूपणे *गुरुचरण कौमुदी,*बालबुद्धिविवर्धिनी

**(य १८) *योगप्रभाव (रु.१२०)**
सूत्रे ४० वर मराठी गद्य भाष्य

**(य १९)** (रु.१०)
*मनोहरिणी गीता (हिंदी)*गीतानिरूपणे *भक्त्यधिकरण न्यायमाला,

### वरील खंडान्तर्गत
## निवडक प्रकाशने

भगवद्भक्तिसौरभ (रुक्मिणी पत्रिका)
*योगरहस्य-१०ग्रंथ (रु.३०)
*योगसाधना ११ पत्रे (१०)
*आख्यानसंग्रह (२०)
*मोक्षपट (रु.२०)
*बुवाबाजी, (रु.२०)
*मणिमंजुषा (रु.६)
*मौलिकविचार (रु.२०)
*गीतगुलाब (निवडक अभंग)(रु.२०)
*गीता निरूपणे (रु.८०)
*योगवासिष्ठ निरूपणे (३०)
६*ज्ञानेश्वरकन्येची लोकगीते-लावणी इ. (२०)
*मानसायुर्वेद (४ ग्रंथ) (२०)
*ज्ञानपाठ (रु.२)
*हरिपाठ- सार्थ/अर्थक्रम (रु.३)
*रुक्मिणीस्वयंवर (रु.३)
*नित्यपाठ (रु.३०)
मौलिक विचार (रु.२०)

**कॅसेट** (रु.५०)
*आंधळी गौळण कॅसेट - अजित कडकडे, शोभा जोशी, यशवंत देव
*आळंदीवल्लभा कॅसेट (रु.५०) (शोभाजोशी, यशवंत देव.)
*पदांची कॅसेट (५०) (डॉ.माधवराव खापरे)

### श्री बाबाजीमहाराजांचे ग्रंथ

*हरिपाठरहस्य (रु.४०)
*अमृतानुभव कौमुदी, (रु.१००)
*ज्ञानेश्वरी गूढार्थदीपिका, (रु.१३०)
*अभंगगाथा, (रु.५०)
*आर्यधर्मोपपत्ति, (रु.५०)
*विविध लेखसंग्रह,
*संतकथा, (रु.६)
*वेदस्तुतिदीपिका, *पंचदशीप्रवचने, *भागवतप्रवचने, *गीता (सार्थ),

### श्री. राजेश्वरराव त्रिपुरवार

*श्रीगुलाबरावमहाराजांचे चरित्र (अधिकृत) (रु.९०)

## मधुकोषाचे निर्माते
## कै. भाऊसाहेबजी खापरे

('भक्तिसुधा' द्वैमासिकातून प्रकाशित झालेल्या संदर्भसहित मधुकोषाच्या प्रथमखंडाची प्रस्तावना २३-२-१९७१)

श्रीगुलाबरावमहाराजांच्या ग्रंथातील समान विचारांचे कण एकत्र निवडून वेचून कै. दत्तात्रय गणपतराव खापरे यांनी तयार केलेला हा माधुर्यमधुकोष आहे. भक्तिसुधा द्वैमासिकाच्या अगदी पहिल्याच अंकापासून त्याला जोडून हा कोष प्रसिद्ध करणे सुरू झाले. किंबहुना, या कोषाच्या प्रसिद्धीसाठीच भक्तिसुधा प्रकाशनाची कल्पना सुचली असे म्हणण्यास हरकत नाही. आजवर प्रसिद्ध झालेल्या मधुकोषाचा हा प्रथमखंड स्वतंत्र ग्रंथरूपाने वाचकांना उपलब्ध करून देतांना फार आनंद होत आहे.

### *श्रीगुलाबरावमहाराजांचे जीवन*

हा कोषग्रंथ हाती घेण्यापूर्वी कोषग्रंथासमवेत श्रीगुलाबराव महाराजांच्या चरित्राची त्रोटक तरी कल्पना वाचकांना असावी याच दृष्टीने सुरुवातीचे हे दोन शब्द आहेत. मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळाने श्रीमहाराजांचे श्री. त्रिपुरवारांनी लिहिलेले अधिकृत विस्तृत चरित्र प्रकाशित केले आहे. त्यावरून महाराजांच्या अलौकिक विभूतिमत्त्वाची कल्पना प्रत्येकालाच येऊ शकेल.

सच्चरित्र म्हटले की ते सत्काव्याप्रमाणे 'चमत्कृति' विना राहत नाही हा नियमच आहे. श्रीमहाराजांनी सिद्धिमूलक चमत्काराचा जरी निषेध केला तथापि त्यांचे समग्र जीवनच बुद्धिवाद्यांना कोडे वाटावे इतके अद्भुत झाले आहे. श्रीमहाराजांचा जन्म वऱ्हाडातील आडवळणावरील एका माधान नावाच्या खेड्यात झाला. आई वडील शेतकरी कुणबी कुटुंबातील. महाराजांच्या वडीलांचे नाव गुंडोजी व आडनांव मोहोड. महाराजांनी दृष्टि एकवर्षाच्या आतच गेली. अर्थात् ग्रंथाभ्यासाचे साधन अगदी शैशवातच हरवले. श्रीमहाराजांनी आपली जीवनयात्रा देखील वयाच्या तेहत्तिसाव्या वर्षी संपविली. त्यातील काही वर्ष बाल्य व कौमारलीलेत गेली. अगदी फारच थोडा काळ - सुमारे दहापंधरावर्षे उरला. परंतु या अल्पकाळातच मधुराद्वैत संप्रदायाची स्थापना व ग्रंथनिर्मिति ही दोन महत्कार्ये श्रीमहाराजांनी उरकली हे लक्षात आणले म्हणजे श्रीमहाराजांच्या विभूतिमत्त्वाची खात्री पटते.

### *ग्रंथातील विषयांची विविधता*

श्रीमहाराजांनी एकूण सोळा ते वीस ग्रंथ लेखकांकडून लिहविले. त्याव्यतिरिक्त, भाषण, प्रवचन, संवाद, भजन इत्यादीतून वाङ्मयप्रवाह अविरत वाहत राही. तो साराच लेखनिविष्ट होतां तर श्रीमहाराजांच्या नांवे एक मोठा ग्रंथार्णवच तयार झाला असता. लेखनिविष्ट झालेल्या ग्रंथात हिंदी, मराठी, संस्कृत अशा तीन भाषातून रचना झाली आहे. एकूण या वीस खंडातून एकहि महत्त्वाचा असा विषय परामर्शाविना राहिलेला नाही. व्याकरण, साहित्य, न्याय, सांख्य, योग, वेदांत इत्यादि शास्त्राबरोबरच गायन, छंद, आयुर्वेद, इतिहास इ. अनेक विषयांना श्रीमहाराजांनी बोट लावून ठेवलेलेच दिसेल. महत्त्वाची आणि आश्चर्याची गोष्ट ही की या अल्पशा स्पर्शाने देखील त्या त्या शास्त्रातील प्रमेयांचे नवे नवे दर्शन घडत आहे असा वाचकांना प्रत्यय येतो.

काव्यसूत्रसंहितेतील **'विकारविचारयोः ऐक्यं स्थायिभावः'** अशा सारखी सूत्रप्राय वचने तर महाराजांच्या वाङ्मयात जागोजाग दिसतील.

छंदःशास्त्रात नसलेली नवीन वृत्ते इथे आपल्याला आढळतील.

शब्दप्रामाण्याचा आधार न घेता केवळ बुद्धिवादाने विषयाचे विवेचन केलेले आपल्याला दिसेल.

मोठमोठ्या पूर्वसूरींच्या वचनातील विसंवाद सडेतोडपणे दाखवून दिलेला महाराजांच्या ग्रंथात दिसून येईल.

एकूण, विषयांची विविधता, मार्मिक विवेचन व समन्वयाची अपूर्वदृष्टि या त्रिविधगुणांनी विनटलेले हे श्रीमहाराजांचे वाङ्मय पाहिले की त्यांच्या अलौकिक अद्वितीय प्रतिभेचे दर्शन घडून माणूस सश्रद्ध बनू लागतो आणि परमेश्वराच्या नित्यसिद्ध स्वयंभू ज्ञानाचे अस्तित्व पटवून देण्यासाठीच श्रीमहाराजांनी शास्त्राभ्याससंस्कार नसलेल्या कुळात जन्म घेऊन व बाह्यदृष्टि देखील मालवून एवढी ग्रंथरचना करून दाखविली असा विचार मनात येऊ लागतो.

### *मुख्य विषय मधुराद्वैत*

मधुराद्वैताची स्थापना हे श्रीमहाराजांचे जीवितकार्यच असल्याने त्यांच्या ग्रंथातील अधिकांश भाग तद्विषयक विवरणाने व्यापला असणार हे उघड आहे. या मधुराद्वैत तत्त्वज्ञानाचे आपण जनक आहोत अशी श्रीमहाराजांची धारणा नाही. उद्घाटन मात्र नवे आहे हीच त्यांची प्रांजळ भूमिका आहे. हे उद्घाटन करण्याकरिता त्यांनी वेद उपनिषदे या सोबत पुराणे श्रीमच्छंकराचार्यांचे ग्रंथ, संतांचे ग्रंथ इ. सर्वप्रमाण सामग्रीचे आलोडन करून मधुराद्वैताची सिद्धि करून दाखविली. परमेश्वराप्रत 'पत्नी' भावनेने केलेल्या प्रेम समर्पणाला 'मधुर' हे पारिभाषिक नांव पूर्वीचेच रूढ होते. हे प्रेम अद्वैतदशेत-ज्ञानोत्तरदशेत असू शकते, असते. किंबहुना, ज्ञानोत्तरदशेत भगवत्प्रेमाचे अस्तित्व हीच खरी ज्ञानाची परिणति होय, असे थोडक्यात मधुराद्वैताचे सार किंवा 'सांगी' म्हणून सांगता येईल.

श्रीमहाराजांच्या ग्रंथातील प्रमुख प्रतिपाद्य विषय मधुराद्वैत असल्याने या कोषालाहि 'माधुर्यमधुकोष' हे नांव दिले आहे. अवांतर विषय यात असणार नाहीत असा त्याचा अर्थ नाही. परंतु ते सारे विषय ग्रहमालेतील इतर ग्रहांप्रमाणे या मुख्य विषयाभोंवती फेरी घालण्यासाठीच आहेत हे मात्र स्पष्ट आहे.

### *कोषाचे निर्माते : श्री. भाऊसाहेबजी खापरे*

हे कोषाचे कार्य वैकुण्ठवासी श्री. भाऊसाहेब तथा दत्तात्रय गणपतराव खापरे यांनी करून ठेवले होते. जवळपास आपली सारी हयात वेचून त्यांनी हे काम केले म्हणूनच ते होऊ शकले. सहस्त्रावधि पानांचे श्रीमहाराजांचे वाङ्मय त्यात आलेले विषय देखील विविध व वैचित्र्यपूर्ण आहे. श्रीमहाराजांचे विवेचन देखील दुरवगाह व गंभीर. परंतु या सर्व विषयांचा ठाव शोधण्याजोगी बुद्धि श्री. भाऊसाहेबांना श्रीकृपेने लाभली होती.

श्री. भाऊसाहेब हे श्रीगुलाबरावमहाराजांच्या पाच अंतरंगशिष्यांपैकी एक होत, यावरून श्री. भाऊसाहेबांच्या परमार्थविषयक अधिकाराचीहि कल्पना येऊ शकेल. उमा माता, पिता शंकर, गुरु ज्ञानेश्वर, पति श्रीकृष्ण व भगिनी गोपिका - असे आपले आराध्यपंचायतन श्रीमहाराजांनी वर्णिले आहे. या पंचायतनाप्रमाणेच ज्या शिष्यपंचायतoooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooनाचा महाराजांनी गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांना गुरुबुद्धीने वंदन केले व आपल्या सांप्रदायिकांना वंदन करण्याचा दंडक घालून दिला त्यात श्री. भाऊसाहेब खापरे यांचा अंतर्भाव आहे. यासारखा श्री. भाऊसाहेबांच्या योग्यतेचा अन्य पुरावा असेल असे वाटत नाही. या आंतरिक योग्यतेबरोबरच शास्त्रपांडित्य पेलण्याइतक्या सूक्ष्म कुशाग्र बुद्धीचे देणे देखील श्री. भाऊसाहेबांना लाभले होते.यासाठीच श्रीगुलाबरावमहाराज मोठ्या कौतुकाने भाऊसाहेबांचा 'तत्त्वज्ञ' म्हणून निर्देश करीत. श्री. भाऊसाहेब देखील श्रीगुलाबरावमहाराजांच्या सान्निध्यात नित्य चालणाऱ्या वाद-विवाद-चर्चेत समरसतेने भाग घेत असत.

श्रीगुलाबराव महाराजांचे शिष्योत्तम व मधुराद्वैत संप्रदायाची धुरा श्रीमहाराजानंतर समर्थपणे सांभाळणारे श्री. बाबाजीमहाराज पंडित यांची श्रीगुलाबराव महाराजांशी प्रथम भेट घालून देणारे श्री. भाऊसाहेबच होत. अशा रीतीने, बुद्धिमत्ता, ग्रंथपांडित्य श्रीगुरुकृपा, दीर्घकाळ गुरुसान्निध्य व संप्रदायातील वडीलकी या नात्याने श्री. भाऊसाहेबांचा मान मोठाच होता. असल्या थोर भक्ताने हे कोषाचे काम आपल्या मननसुखासाठी स्वतःचा वकीलीचा व्यवसाय देखील टाकून देऊन पूर्ण करून ठेवले.

***द्विविध अन्वय***

जुन्या संस्कृताध्यापनाच्या पद्धतीत काव्याचा अर्थ जाणून घेण्यासाठी खंडान्वय व दंडान्वय असा दोन तऱ्हेचाहि अन्वय आवश्यक मानला जाई. श्रीगुलाबरावमहाराजांच्या ग्रंथातील समग्र विषय श्री. भाऊसाहेबांनी असा वर्णानुक्रमाने पुनः मांडून दाखविला असल्याने श्रीमहाराजांच्या वाङ्मयाचाहि द्विविध अन्वय लक्षात ठेवण्याची अभ्याकांना आता चांगली सोय झाली आहे.

ते ते विषय त्या त्या ग्रंथातील उपक्रमोपसंहारासह अभ्यासणे हे जितके महत्त्वाचे तितकेच एकच विषयांश श्रीमहाराजांच्या समग्रग्रंथसंग्रहात कशा रीतीने हाताळला गेला हे एकत्र पाहता येणे, हेहि महत्त्वाचे आहे. श्रीगुलाबरावमहाराजांच्या ग्रंथाची ही एक नवीच मांडणी म्हणता येईल. अर्थात ही मांडणी करताना श्री.भाऊसाहेबांना आपल्या सूक्ष्मदर्शी प्रज्ञेला बरेच राबवावे लागले असेल. कारण, मन, बुद्धि, अहंकार इ. विषयांचे विवेचन एकमेकात सहजच गुंतून पडलेले असणे स्वाभाविक आहे. ही नवी मांडणी करताना सारख्या सारख्या विषयांची संकीर्णता किंवा गुंतागुंत टाळण्यासाठी श्री. भाऊसाहेबांनी आपली विश्लेषणपटुता चालवून अभ्यासकांवर फार मोठे उपकार करून ठेवले आहेत यात शंका नाही.

*(मधुकोषाच्या या प्रथमखंडात प्रथम 'अंतःकरण' विषयक विचार संकलित झाले असून शेवट'अद्वैतसिद्धी' ने झाला आहे. 'अंतःकरणा'ने आरंभ करण्याऐवजी 'ॐ'काराने आरंभ होण्यात विशेष औचित्य साधले असते. परंतु तो मोठाच औचित्यभंग आमच्याकडून होऊन गेला खरा. वरील प्रमादाबद्दल वाचकानी क्षमा करावी. मधुकोषात आलेला विषयानुक्रम पुढीलप्रमाणे आहे. अंतःकरण, बुद्धि, चित्त, मन, अहंकार, ॐकार, अगस्तिसंहित, अग्नि, अग्निपुराण, अक्कलकोटस्वामी, अंचितनीय भेदाभेद, (चैतन्यसंप्रदाय) अचेतन, अचौर्य, अजातवाद, अणिमा, अणु, अन्तवाहक, अंतर-अंतरा, अंतर्यामी, अतीत, अतिथि, अतिवर्णाश्रमी, अतिवादी, अत्रिस्मृति, अथ, अदृष्ट, अदृश्य, अद्भुतरस, अद्वैत, अद्वैतानंद व अद्वैतसिद्धि.)*

विषयांच्या या तालिकेवरून श्रीमहाराजांच्या ग्रंथात किती विविध विषय परामर्शिले गेले आहेत याची स्थूल कल्पना येऊ शकेल. कोणताहि विषय घेतला तरी त्याच्या समग्र व्याप्तीसह तो हाताळावयाचा ही श्रीमहाराजांची शैली असल्यामुळे मनाच्या संदर्भात वाचकांना मानस-आयुर्वेदविषयक विचार देखील अभ्यासावयाला मिळतील व सरते शेवटी या अवांतर शास्त्रप्रमेयज्ञानाचा परमार्थात, विशेषतः भक्तिमार्गात- कसा व कितपत उपयोग होऊ शकतो याबाबत निश्चित मार्गदर्शन मिळेल. हीच गोष्ट श्रीमहाराजांच्या विवेचनात येणाऱ्या प्रत्येक शास्त्रसिद्धांताबाबत म्हणता येईल. उदाहरणच द्यायचे झाल्यास, प्रणवाचे- ॐकाराचे विवेचन पुढे ठेवण्याजोगे आहे. शास्त्रात इतरत्र वर्णन केलेले ॐकाराचे महत्त्व व स्थान तर इथे वर्णन केलेले असेलच; परंतु त्यासोबतच भगवंताच्या अन्यनामाचीहि प्रणवतुल्यता इथे दाखविली असेल. त्यामुळेच महाराजांच्या विवचेनाची परिणति केवळ तात्त्विक शास्त्रचर्चेतच न होता शेवटी त्यातून परमार्थाच्या पथिकाला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आवाहन केलेले आढळते. शास्त्रचर्चेचा श्रीमहाराजांच्या लेखणीला कंटाळा आहे असा त्याचा अर्थ नाही.

***श्रीमधुसूदनसरस्वती***

*मधुकोषाच्या या पहिल्या खंडात शेवटच्या 'अद्वैतसिद्धि' प्रकरणानेच अधिक पाने व्यापलेली दिसतात. त्यात शास्त्रचर्चेवरच अधिकांश भर आपल्याला दिसेल. 'अद्वैतसिद्धि' हा श्रीमधुसूदनसरस्वतींचा वेदान्तातील बृहत्त्रयी मध्ये अंतर्भूत असणारा प्रसिद्ध ग्रंथ. भक्तिशास्त्रात श्रीमधुसूदनांचे स्थान देखील अनन्यसाधारण. चैतन्यसंप्रदायातील रूपगोस्वामी व अद्वैतपरंपरेतील श्रीमधुसूदनसरस्वती ही भक्तिरसाची समर्थन करणारी जोडी कोणाहि भक्तिवाङ्मयाभ्यासकाला विसरता येणार नाही. त्याच श्रीमधुसूदनांनी अद्वैतसिद्धीत भगवंताच्या साकार स्वरूपाचे खंडन केलेले पाहून त्यांच्याशीहि झुंज करावयास श्रीगुलाबराव महाराज किती सिद्धसंनद्ध होऊन बसलेले आहेत हे 'अद्वैतसिद्धि' प्रकरणात पाहावयास मिळते. श्रीमधुसूदन असोत की श्रीवल्लभाचार्य असोत; भक्त्याचार्य म्हणून त्यांच्या विचारातील वा दर्शनातील ग्राह्यांश स्वीकारून आवश्यक तेथे त्यांच्या अन्य विचाराचा खरपूस समाचार घेण्यास श्रीमहाराज मुळीच कचरत नाहीत. परंतु हे खंडन नीट समजून घ्यावयाचे असल्यास मधुकोषाबरोबरच ज्या मूळग्रंथातून हे विवेचन या कोषात संकलित केले आहे ते ग्रंथ देखील पुढे ठेवणे आवश्यक आहे.*

संपूर्ण मधुकोषाचा विस्तृत परामर्श किंवा त्यातील विषयांची चिंतनिका या थोड्या जागेत घेता येणार नाही. वाचकांनीच आपआपल्या अभिरुचीप्रमाणे श्रीगुलाबरावमहाराजांच्या ग्रंथातून आलेले हे विषय पुस्तकांच्या व मधुकोषाच्या आधारे अभ्यासावे अशी त्यांना आग्रहाची नम्र विनंती आहे.

*दि. २३-२-७१ महाशिवरात्रि*

***

बालांध विभूती मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबराव महाराज यांच्या समग्र वाङ्मयात आलेल्या अनेक विविध विषयांच्या संदर्भाची सूची, माधुर्य मधुकोष या ग्रंथाच्या रूपाने कै. भाऊसाहेब उर्फ दत्तात्रय गणपतराव खापरे यांनी ३०-४० वर्षे परिश्रम करून तयार केली आहे. श्री भाऊसाहेब हे श्रीमहाराजांच्या शिष्य पंचायतनातील होते यावरून त्यांची पारमार्थिक योग्यता केवढी मोठी होती हे कळून येईल.

श्रीमहाराजांच्या वाङ्मयातून समुद्रातील मोत्यांप्रमाणे अनेक विविध विषय आलेले आहेत त्यामुळेसर्वप्रकारच्या निरनिराळ्या संप्रदायातील जिज्ञासूंना, त्यांच्या वाङ्मयातून त्यांना आवडत असलेल्या विषयांविषयीचे श्रीमहाराजांचे विचार समजून घेण्यास या माधुर्य कोषाची फार मोठी मदत मिळेल.

श्रीभाऊसाहेबांनी मधुराद्वैताचार्यांच्या अमूल्य रत्नावलीतील एकेक सूक्ति-रत्न निरखून पाहिले आणि माधुर्यमधुकोष निर्माण केला. त्यातील अफाट विषयांची विविधता पाहून मन आश्चर्याने थक्क होतं.

यात केवळ विषयांची सूचि नसून, श्रीगुलाबरावमहाराजांनी ज्या ज्या विषयांना स्पर्श केला, त्या त्या विषयांचे अनेक पैलू उलगडून दाखविलेले आहेत, आणि तेही केवळ एकेका सोप्या वाक्यात !

या मधुकोषातील असंख्य विषयांची मार्मिकता, सूक्ष्मता आणि व्यापकता पाहून या माधुर्यसागरात अखंड डुंबतच रहावं- त्यातून बाहेर येऊच नये, अशी ओढ निर्माण होते.

याचे कारण, भाऊसाहेबजींनी गुरुकृपेच्या बळावर गुरुमुखातील शब्दांचा अर्थ जाणला, स्वतः तो अनुभवला आणि ''ये हृदयीचं ते हृदयी'' घालण्यासाठी ज्ञान-भक्तीचं आवारच उघडून दिलं.

॥ श्री गणेशाय नमः ॥

माता मे पंचलतिका वासुदेवः पिता मम ।
मातामहश्च ज्ञानेशो भ्राता नारायणस्तथा ॥
उमामहेश्वरावाद्यौ मम वंशधरावुभौ ।
कुर्वन्तु मंगलं सर्वे चिदानंदः स्वरूपिणः॥

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

# ॥ मातृ-परिवार वंदन ॥

**श्री भारतभूमीचा जयजयकार असो !**

ज्या **विदर्भ** देशांत माझी माता अवतीर्ण झाली त्या विदर्भ देशाचा जयजयकार असो !

ह्या देशांतील ज्या भागास माझ्या आईचे श्रीचरणांचा स्पर्श झाला तेथील परम भाग्यवान् **रजःकणांस** माझे शतशः नमस्कार असोत !

आजोबांची सच्चिदानंदमूर्ति ज्यांत सदैव विराजमान आहे त्या माझ्या आईचे हृत्कमल ज्या माधान ग्रामांत विकास पावले त्या ग्रामातील **स्थावर जंगमादि सर्व पदार्थ** व तेथील **कृमि कीटकादि स्थूल सूक्ष्म जंतू** ह्यांस माझा पुन्हा पुन्हा नमस्कार असो !

अनंत कोटि ब्रह्मांडाधीश षड्गुणैश्वर्यसंपन्न परमात्म्याची चित्कला ज्या मोहोड वंशांत उदय पावली त्या **मोहोड वंशास** माझा प्रणाम असो !

मूळ सूर्य वंशापासून विस्तार पावून ब्रह्म तेजास प्रसवणाऱ्या ह्या चिद्गंगेत स्नान करून सर्व लोक पवित्र होवो, शांत होवो, चिद्रूप होवो !

ज्या पिते **गोंदुजी** ह्यांचा अनंत जन्मातील पुण्याच्या परिपाकामुळें माता **अलोका** हिचें उदरीं माझी आई प्रगट झाली त्या तीर्थरूप गोंदुजीना माझा नमस्कार असो !

तसाच मातोश्री **अलोकेलाही** माझा नमस्कार असो !

ज्या **लोणी** ग्रामांत मातोश्री अलोका हिचे वडिलांचे घरीं माझी आई प्रथम आविर्भाव पावली त्याला माझा प्रणाम असो !

त्यावेळचे तें **वृषभ संवत्सर,** तो **आषाढ** मास आणि त्यांतील **शुक्लपक्ष** हे धन्य होत !

अनादि अनंत कालांत झालेल्या
**ह्या पर्वणीचा स्मृतिदिन सर्वलोक पाळोत !**
व आपल्या अंतःकरणांत त्या बाळ मातेला धारण करोत !

''मोठ्याणीदार डोळे, सांवळा वर्ण, सरळ नासिका, पुष्ट व गोंडस हातपाय असलेली सुंदर नारायणां सारखी लोभस मूर्ति'' हेनित्यकीर्ति राजेश्वरानेंदिलेलेआईचे **बालध्यान** सर्व जन आपले चित्तांत जतन करून ठेवोत !

ह्या जग जननी ''सुंदर नारायणीला बाळपणीं मातृहीन मानून लोणी येथें लाडानें वागविणाऱ्या **ताईला** माझे नमस्कार असोत !

ज्या **रघुजी पाटील बुवांना** माझ्या अदिशक्ति आईनें आपले जनक मानून त्यांचा सर्व दंड सहन केला व पुढे त्यांना शिव लोक प्राप्तीचेआश्वासन दिले त्यांना माझा नमस्कार असो !

माझ्या आईनें लीलेने एकाच बुक्कीनें नारळ फोडून पैजेनें मिळवून पाणिग्रहण केलेली व परमात्म्याशी पाणिग्रहण करून दिलेली, परम अनुरक्त भक्त श्रेष्ठ माझ्या आईची इहलोकांतील मुख्य शिष्या जी **सौ. मनकरणिका आई** तिच्या चरणांवर माझे मस्तक अखंड विराम पावो !

आत्मक्रीड अशा माझ्या आईच्या अकृत्रिम प्रेमरसाचा सहज आस्वाद घेणाऱ्या **रामचंद्र, विश्राम, तुकाराम, बळीराम, यादवादि** बाळपणाच्या खेळगड्यांनामाझे शतशः प्रणाम असोत !

अनादिसिद्ध माझ्या आईचा विद्यारंभ करणारे उदारबुद्धि **रामराव तात** ह्यांना माझे वंदन असो !

श्रीहरीशी एकरूप असणाऱ्या माझ्या आईला हरिविजयादि ग्रंथांचा पाठ देणाऱ्या **लक्ष्मण भट्टजीला** माझा नमस्कार असो !

आईचे आत्म, मित्र आणि शिष्य अशा परम गुरुभक्त **रामचंद्रभाऊनां** पुन्हा एकवार माझा नमस्कार असो !

ज्या साध्वीनें बाळपणीं माझ्या आईवर मातृतुल्य प्रेम करून संगोपन केले, पिंगा, फुगड्या, वगैरे खेळून तिच्याशीं समरस झाली, व्रतादिप्रसंगी धुरंधरपणें सर्व भार स्वतःवर घेऊन निरलसपणें कार्यतत्पर राहिली व शेवटी प्रेमवर्धनार्थ तनुदान देऊन संप्रदाय चालू केला त्या जननी **रंगूबाईला** तिच्या सर्व परिवारासह माझे शतशः सहस्रशः पुन्हा पुन्हा वारंवार नमस्कार असोत !

माझ्या आईचा आज्ञेनें एकनिष्ठ वेश्याचारांत दिवस घालवून शेवटीं आजोबांचे ध्यानांत आपले कलेवर सोडून आज पूर्ण प्रेमाचा आस्वाद घेणाऱ्या **हिराताईला** माझे वंदन असो !

माझ्या आईशीं विपरीत वर्तन करून पुढील जन्मात परमात्मप्राप्तीचा वर मिळवून

घेणाऱ्या एकनिष्ठ **काशीबाईला** माझा प्रणाम असो !

खानपानादि सर्व व्यवस्था प्रेमपूर्वक करून उमरावती ग्रामांत प्रवेशारंभी भगवत्सहकारी माझ्या आईस साह्यभूत झालेल्या **जमनाबाईचे** चरणांस अनेकवार माझा प्रणाम असो !

माझ्या आईच्या सासू **सारजा-आजी** व शालक **दत्तूमामा** ह्यांनी केलेल्या सेवेचे पुन्हा पुन्हा स्मरण करून आईच्या देवदुर्लभ अशा चरणकमलाचा आस्वाद घेणाऱ्या दत्तूमामांच्या हस्तांना माझे वंदन असो !

यावली येथील ज्यांचे घरी माझे आईनें कित्येक महिने राहून त्यांचे घर पवित्र केले त्या **आकाजी बापूला** माझा नमस्कार असो !

तसेंच यावली येथील ज्या **गणपतराव अवचिताचे** प्रेमामुळे माझी नित्यतृप्त आई त्यांचे हातची पोळी फार आवडीनें मागून घेत असे व त्यांचेच ताटांत बसून त्यांचे बरोबर जेवत असे त्यांना माझे वंदन असो !

बालवैधव्याचे दुर्धर स्थितींत माझे आईनेजिचा स्वीकार केला, जिला ज्ञान दान देऊन शांत केले, जिच्या सर्व वृत्ति परमार्थाभिमुख करण्याकरतां परोपरीचे यत्न केले त्या **शिरसगांव** येथील माझ्या आईच्या प्रेमळ **ताईला** माझे वंदन असो !

माझे आईपासून अनुभवामृताचे ग्रहण करून तेंच अमृत दुसऱ्या करतां जतन करून ठेवणारे व त्या परमामृताच्या तृप्तीमुळे **प्रायोपवेशनांत तनुत्याग करणारे संप्रदाय-शिरोमि हरिभाऊ केवले** माझ्याआईचा चरणकमलाच्या नित्य आस्वाद घेत माझ्या अंतःकरणांत सदैव विराजमान असोत !

बाबांच्या नित्य अर्धांगीनी माझ्या आईनें भगवत्प्राप्तीकरितां श्री कात्यायनी मंत्राची दीक्षा ज्या **दामोदरशास्त्री** पासून घेतली त्यांना माझा प्रणाम असो !

ज्यांनी माझ्या आईचे स्तनपान करून तेथील दुग्ध इतरांना सुलभ करून दिले व ज्यांचे प्रेमवृद्धी करता माझ्या आईच्या नित्य शांत चिद्‌वृत्ति तळमळतांना दिसत त्या श्री **श्रीनिवास शास्त्रींना** माझेवंदन असो !

माझी आई हीच ज्यांची परमदेवता असून ज्यांनी आत्मरति अशा माझ्या आईला सुहृत्प्राप्ति करून दिली त्या **वासुदेवराव मुळ्यांना** माझे वं**द** असो !

ज्यांनी आपले अंतःकरण माझ्या आईला पूर्ण समर्पण करून दिले ज्यांना माझ्या आईवांचून दुसरा आशातंतूच उरला नाही, त्या माधुर्यप्रेमाची याचना करणाऱ्या **गणपतराव भालेरावांना** माझे वंदन असो !

श्री **निवास शास्त्री, वासुदेवराव मुळे** व **गणपतराव भालेराव** ह्यांची माझ्या आईचा

अनादि स्वतःसिद्ध संप्रदायाला आधार असलेली व प्रेमस्वरूप माझ्या आईला प्रिय असलेली ही वृद्ध-त्रयी अखंड विनीत भावानें हृदयांत धारण करून, माझ्या आईची सेवा करणाऱ्यांचे पदकमल माझ्या मस्तकावर सदैव विलास पावो !

माझ्या आईवर प्रेम करणारे **गोविंदराव राजूरकर** व **कांतोपंत** यांना माझेअनेकवार वंदन असो !

माझ्या आईवरील प्रेमामुळे ज्यांनी आपल्या गृह-दारादिकांचा त्याग करून आपल्या कर्णमधुर सुस्वर गायनाने ज्यांनी माझ्या हरिगान लुब्ध मातेला रिझविले व जे आमरण आजोबांच्या चरणांचा आश्रय करून राहिले त्या महात्म्या **व्यंकटरावचे** चरणांवर माझे मस्तक सदैव विश्राम पावो !

ज्यांनी माझे आईचे सेवेंत निरंतर राहून आपले मन व शरीर आपले आईचे चरणीं अर्पण केले, ज्यांनी माझ्या आईला मातृरूपाने व ज्यांना माझ्या आईनेंपुत्ररूपानें आपल्या अंतःकरणांत साठविले त्या केवळ अपररूपधारी मातृस्वरूपी **नानाजी कवि मंडन** ह्यांना, 'माझ्या आईला व माझ्या आईचे प्रतिनिधी (श्रीबाबाजीमहाराज पंडित) ह्यांना भेदबुद्धीनें न पाहतां आईला शरण गेल्यासच माझ्या आईचे अंतःकरणात जागा मिळेल' हें पूर्ण जाणून माझे मस्तक त्यांचे पायीं लीन होवो !

ज्यांचा माझे आईचे चरणांवर भरवसा आहे व जे सर्वमय अशा माझ्या आईचा साक्षात्कार भावित होते त्या **ठोंबरे** ह्यांना माझा प्रणाम असो !

ज्यांनी मला माझ्या आईच्या अवताराचा शुभ संदेश प्रथम सांगितला, ज्यांनीमला माझ्या आईचे ओटींत घातले, ज्यांना बाबांचे काव्यमय वर्णन करण्यास आईनें स्फूर्ति दिली, ज्यांचे भोगमोक्ष आईनें सर्वस्वी स्वतःकडेसच घेतले व स्वप्नांतही दर्शन देऊन ज्यांचा सांभाळ केला व निर्विकार आनंदघन अशी माझी आई ज्यांचा दुःखामुळे दुःखी झाली, कष्टामुळे कष्टी झाली, रोगामुळे रोगी झाली, क्षयामुळे क्षयी झाली आणि ज्यांचा भावी मृत्युमुळे स्वतः अंर्तधान पावली, त्या सुष्टदुष्ट कशाही माझ्या **बापूगडीस,** त्याने मला आईचे चरणावर घातले हें जाणून कृतज्ञतापूर्वक माझे प्रणाम असोत !

ज्यांना पूर्व जन्मातच माझे आईची भेट झाली होती असे वाटत आहे व ज्यांचा ह्या जन्मांतही माझे आईनें स्वीकार केला त्या मंडल्याचे **विठ्ठलराव केकरे** ह्यांना माझा प्रणिपात असो !

तसेच जिला माझ्या आईनेज्ञानोपदेश केला त्या **रुक्मिणी मातेला** माझा नमस्कार असो!

ज्यानें माझ्या आईचे सेवेत आपल्या जन्मादात्या पित्याचीही पर्वा केली नाही, तो सरळ

वृत्तीचा माझा बंधु **गंगाधर मुळे** ह्यास त्याचे वडिलांसह माझा सप्रेम प्रणाम असो !

ज्यांना सदय-हृदय माझे आईनें '**श्रीगुरु आचार्य वेदमूर्ति गोविंद शास्त्री पंचभाई महाराज'** असे संबोधून आपल्या एकएक उपकारांचे स्मरण केले म्हणजे हृदयावच्छेद होऊ पाहतो' असे म्हटले आहे त्या माझे आईचे चरणीं श्रीगुरु रूपाने प्रेम ठेवणाऱ्या **पंचभाई** महाराजांना माझा प्रणाम असो !

ज्याच्या पहिल्याच भेटीस माझ्या आईने पुत्रत्वाने स्वीकार केला, ज्याने परोपरीनें केवल ऐहिक विषयाकरता सुखदुःखातीत अशा माझे आईस कष्टी केले त्या माझ्या आईच्या **दत्तात्रेयास** (स्वयं) माझा नमस्कार असो !

ज्या माझ्या आईच्या सर्व पुत्रांची श्रीयुत वासुदवेराव मुळे यांचे घरी मोठ्या दक्षतेने व्यवस्था ठेवली व माझे आईचे व्रतादि प्रसंगी सहाय्य करीत - त्या **गं. जीजीबाईस** माझा प्रणाम असो !

ज्यांचा माझ्या आईवर फार प्रेम असे व ज्यांनी आपले वृत्त पत्रांत माझे निष्काम आईला इष्ट अशी कित्येक पत्रें छापून सहाय्य केले त्या **लक्ष्मणराव पांगारकरांस** माझे अनेकवार प्रणाम असोत !

ज्यांनी माझ्या आईची आज्ञापालन करणें हाच आपला धर्म मानला, आईचे सेवेकरतांच ज्यांनी स्वतःचा संसार मंडित केला व जे आईचे सनातन संप्रदायाचे संस्थापनेकरता सदोदित झटतात त्या **नारायणराव केकऱ्यांना** व आईवर पूर्णनिष्ठा असणारे त्यांचे बंधु **गणपतराव** ह्यांना आईचे चरित्र प्रकाशित करण्यास सहाय करणाऱ्या त्यांचा वडिलांसह माझे अनेकप्रणाम असोत!

माझ्या आईवर प्रेम ठेवणारे धीरबुद्धि **बळवंतराव केकरे** व त्यांची बहिण **गं. बहिणाबाई** यांना माझा नमस्कार असो !

जे माझे आईचे चरणावर लक्ष ठेवून आपले सर्व व्यवहार करतात त्या **दिनकररावांना** (केंकरे, हरदा) माझे वंदन असो !

ज्यांच्या अव्यभिचारी एकनिष्ठ प्रेमाला वश होऊन पक्षातीत माझ्या आईने ज्यांना गोड मानून आपले म्हटले त्या परम भाग्यवान **विष्णुपंत धामापुरकरांचे** चरणीं माझे सदैव नमस्कार असोत !

आपली सर्व ऐहिक बंधने तोडून जे माझे आईचा आश्रय धरून राहिले ज्यांनी आपले आयुष्य केवळ माझ्या आईच्या गुणवर्णन करण्यांतच घालविले. ज्यांनी आईचे चरित्र वर्णन करून सर्व लोकांस उपकृत करून सोडले व जे देशकालातीत माझ्या आईच्या वर्णनाने इहलोकातच अमर झाले, त्या माझ्या आईच्या चरणकमलाचा नित्य आस्वाद घेणाऱ्या **राजेश्वर मिलिंदास**

(त्रिपुरवार,चंद्रपूर) कृतज्ञतापूर्वक माझे अनेक प्रणाम असोत !

ज्यांनी आस्थापूर्वक माझ्या आईच्या चरणामृताचे बरेच दिवस सेवन केले, त्या माझ्या **भक्त भाऊस** मझेवंदन असो !

ज्यांचा माझ्या आईचे चरणावर अविचल विश्वास आहे. ज्यांचेहातून आईने साधकांचे कल्याणाकरता 'निदिध्यसानप्रकाशा'ला उदयास आणले व माझ्या आईच्या ग्रंथांच्या अध्ययनांतच जे कृतकृत्य आहेत त्या सरळ हृदय निष्कपट बंधु **यशवंतरावांना** माझे वंदन असो !

ज्यांनी माझ्या आईवर स्वतःची जन्मान्तरीय मुलगी समजून प्रेम केला त्या **प्रियनाथ मुकरजींना** माझे अनेक नमस्कार असोत !

माझ्या आईच्या गळ्यांतील कंठमणी,
माझ्या आईचे परिचर्येकरतां अवतरलेली मूर्त-सेवा,
स्नेह-दया, सुख-दुःख, माता-पिता, पुत्र-कलत्रादिकांना -
आईच्या प्रेमापुढे तुच्छ मानणारी दयामय मूर्ति,
स्वकीयांच्या प्रेमरक्षणार्थ राहिलेले आईचे अमररूप,
मला संकट समयीं प्रोत्साहन देवून इहपर विषयांत सहाय्य करणारे माझे आप्त,मित्र,सुहृत्,
माझे **नारायणराव पंडित** (श्री बाबाजी महाराज) ह्यांना माझे अनेक नमस्कार असोत !

ज्याला माझे आईने आपला म्हणून त्याला आजोबांचेच नाव ठेवले त्या माझे आईचे चरणावर पूर्ण प्रेम ठेवून तिची सेवा करीत असलेल्या माझ्या **मांढरे** बंधूस (पुणे) माझा प्रणाम असो !

जिचे सर्व अपराध क्षमाकरून माझे आईने जिचा स्वीकार केला व जी शेवटीं आपल्या वेडांत देखील जी आईचे अनुकरण करीत होती त्या लष्करच्या **रमाबाईला** माझे नमस्कार असोत!

जी कौटुंबिक दुःखाने पूर्ण गांजून गेली होती व जिला माझे आईनें आपला पूर्ण आधार देवून परोपरीने जिचे अंतर्बाह्य संरक्षण केले व जिने आईचे चरणीं आपले सर्वभाव समर्पण केले त्या मातोश्री **दुर्गाआईस** माझे अनेकवार अनेक प्रणाम असोत !

माझे आईचे प्रेमस पात्र झालेले भावपूर्ण **बाबुराव तांबे** यांना माझे प्रणाम असोत !

माझ्या आईचे प्रेमात तल्लीन होणाऱ्या **मारोती भाऊला** नमस्कार असो !

ज्यांनी उत्तरवासी जनांचा हिताकरता आजोबांची भावार्थदीपिका भाषांतरित केली त्या आईवर प्रेम ठेवणाऱ्या **रघुनाथरावांना** माझे नमस्कार असोत !

लक्ष्मीपतीच्या अर्धांगीनी माझ्या आईस ज्यांनी व्रताकरता प्रेमपूर्वक द्रव्यसहाय्य केले त्या श्रीमान् **अंबादास शेटजींना** माझा प्रणाम असो !

ज्यांनी माझ्या आईचे ग्रंथ प्रकाशनांत साह्य केले व पुन्हा पुन्हा अनेकवार माझ्या आईचे दर्शनघेतल्याशिवाय ज्यांना बरे वाटत नसे, त्या माझे बंधु **गोपाळराव पाध्ये** यांचे चरणीं माझे अनेक नमस्कार असो !

ज्यांनी माझे आईजवळ आपलेहृदय उकलून स्वतःचेकांहीच गौप्य ठेविले नाही, त्या **नरहरशास्त्री धर्माधिकारी** यांना व माझे आईवर प्रेम ठेवणे हेच धर्माचे अंतिम फल यथार्थ रीतीने जाणणाऱ्या त्यांचे बंधु **नीळकंठ शास्त्री धर्माधिकारी** ह्यांना माझे वंदन असो !

माझे आईचे चरणीं आपली चित्तवृत्ति ठेऊन जे आपले आयुष्य शांतपणे व्यतीत करीत आहेत त्या **नारायणराव परांजपे** ह्यांना माझे नमन असो !

जिचे घरी माझे आईने राहून जिचा मातृरूपाने अंगीकार केला त्या मातोश्री **काकूला व यमुना आईला** माझे अनेकवार प्रणाम असोत !

ज्यांनी आमरण आपला काल प्रेमपूर्वक माझे आईचे ग्रंथाध्ययनांत घालविला त्या **दामोदरराव केकरे** यांना व माझे आईवर पूर्णनिष्ठा असणाऱ्या मातोश्री. **भागिरथीबाईंना** माझे वंदन असो !

माझे आईचे साक्षात् संबंधामुळे ज्यांची सेवा करणें माझे कर्तव्य असून ती न केल्यामुळे नाम निर्देशपूर्वक ज्यांना वंदन करण्याचीही मला लाज वाटते त्यांना माझे वंदन असो !

माझे आईवर प्रेमकरणाऱ्या, दृश्य अदृश्य इहलोकांतील परलोकांतील ज्या कोणी व्यक्ति असतील त्या सर्वांना माझे वंदन असो !

माझे आईशी ज्यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष साक्षात् किंवा परंपरेने संबंध आला असेल त्या सर्वांना माझे वंदन असो !

एका भेटीतच ज्यांनी -

**'विराग तव देखुनी मन मनी तुका आठवे ।**
**स्वबोध दिधला तुला मज गमे अळंदीधवे ।**
**तुझ्या बघुनि भक्तिला झुरति मत्सरें गोपिका ।**
**शिरीं धरीन मी अशा पद्भवाचिया पादुका ॥'**

असे माझ्या आईचे वर्णन करून आईच्या पादुका स्वमस्तकावर धारण करण्याची इच्छा प्रगट केली त्या **बाबा गर्देंना** माझा नमस्कार असो !

माझ्यावरील ज्यांचा प्रेमामुळे ज्यांचा नामनिर्देश करून वंदन करणे योग्य अशांना

विस्मृतिमुळे कौटिल्यामुळे किंवा अन्य कोण्या कारणामुळे ज्यांना मी वंदन केले नसेल, त्या सर्वांना माझे वंदन असो !

माझे आईवर प्रेम करणारे मला सारखेच वंदनीय असून अनुक्रमांत किंवा मनास कळत न कळत ज्यांचेविषयी माझेकडूनवैषम्याभास झाला असेल त्यांना क्षमायाचना करून सर्वांना अनेकवार माझे वंदन असो !

गुणवर्णनपूर्वक वंदन करताना ज्यांचे थोरगुण असून, जाणून किंवा न जाणून त्यांचा त्या गुणांचा निर्देश केला नसेल त्यांना क्षमा मागून पुन्हा त्या सर्वांना वंदन असो !

गुणवर्णन करतांना त्यांचाविषयीं, कौटिल्यामुळे किंवा अन्य कांही कारणामुळे बुद्धिपूर्वक किंवा अबुद्धिपूर्वक विपर्यास किंवा अन्य कांही प्रमाद घडला असेल त्यांचे विषयीं माझे ते कौटिल्य किंवा इतर कारण नाहिसे होवो, अशी आईस प्रार्थनाकरून, त्या प्रार्थनेने पवित्र होऊन त्यांना मी पुहा वंदन करतो !

ज्यांचे ठिकाणी वस्तुतः ते गुण नसून त्या गुणांचा निर्देश केला असेल, त्यांचे ठिकाणीं ते गुण येवोत, अशी आईस प्रार्थना करून त्या गुणांनीयुक्त अशा त्या सर्वांना माझे पुन्हापुन्हा वंदन असो !

माझे आईशी प्रत्यक्ष भाषण न होतां केवळ तिचे कीर्तीवर लुब्ध होऊन प्रेमपूर्वक सेवा करणाऱ्या **सोबंशी** आदि महान् श्रद्धावान् सद्‌भक्तांस माझे अनेकवार नमस्कार असोत !

माझ्या आईच्या **प्रतिनिधीवर** अविचल श्रद्धा ठेवून त्यांचे द्वारा माझे आईवर प्रेम करणाऱ्या सर्वगुरुपुत्रांसत्यांचा परिवारासह वय-जाति-मर्यादा-निरपेक्ष माझे वंदन असो !

माझ्या आईच्या सेवेंत प्रतिनिधींना साह्य करणाऱ्या सर्वमात्रांस माझे सविनय वंदन असो!

माझे हें **मातृ परिवार वंदन** प्रत्यही माझे प्रातःस्मरणांत येवो व मला जडाला त्या परिवाराचे चरणाचा आस्वाद घेणाऱ्या पायरीचे स्वरूप प्राप्त होवो,

अशी भीक मागून पुन्हा त्यांना वंदन करतो !

नागपूर फाल्गुन शुक्र ५ शके १८५९ (इ.स. १९४७)

***- दत्तात्रेय खापरे***

***- इति शम् ॥***

---

टीप :- * **आई** = श्रीगुलाबरावमहाराज. * **आजोबा** = श्रीज्ञानेश्वरमहाराज. * **बाबा** = भगवान् श्रीकृष्ण * **प्रतिनिधि** = श्रीबाबाजीमहाराज पंडित

श्री. गोदिंराव लिमये, वय वर्षे ९४, यांनी परम दयार्द्र होऊन आमचे पिताश्रींचे हे मातृवंदनाचे हस्तलिखित उपलब्ध करून दिले याबद्दल त्यांना सर्व खापरेपरिवारातर्फे अत्यंत कृतज्ञतापूर्वक साष्टांग प्रणिपात !

***- मु. द. खापरे.***

*नागपूर, दिनांक १४ - २ - २००३*

॥ श्री ज्ञानेश्वर माउली ॥

# माधुर्य मधुकोष

आदरणीय कै. श्री खापरेजी विदर्भ के बालांध संत गुलाबरावमहाराज के अंतरंग शिष्य थे । उन्होन३०-४० वर्ष परिश्रम करके यह विषयसूचिकोष (एनसायक्लोपिडिया) निर्माण किया है ।

श्रीमहाराजजी के संस्कृत, मराठी तथा हिंदी में लिखे हुएं १३४ ग्रंथों में, कौनसा विषय किस पृष्ठ पर आता है, वह क्रमांक इस कोष में दिया है ।

इस में केवल विषय का नाम और पृष्ठक्रमांक मात्र नही है;
तों खापरेजीनेसूक्ष्म अध्ययन करके,
विषय को पुरा ज्ञात करके,
उसको एक वाक्य में समेटा
और अभ्यासकों कों समजने के लिये छोटेसेंवाक्य मेंलिखा ।

यह विषयसूचि पढकर किसी को भी महाराजप्रतिपादित मंतव्य समझने में बहुत सुविधा होगी । उस विषय का संक्षेप में लेकीन पूर्णतया दर्शन होगा ।

कौनसे भी विषयपर महाराजजी का क्या विचार है यह एक दृष्टिक्षेप में समझने के लिये यह बहुत सुविधा हुई है । इस कोष के आधार से स्नातकोत्तर पी. एच. डी. के उत्सुक छात्रोंको अध्ययन तथा संशोधन के लिए बहुत से विषय प्राप्त होंगे तथा अध्ययन करने में भी बहुत सुविधा होगी ।

एक पेज में ३५ लाईन है X ६०८ = २१२१० से बहुत अधिक २५००० से भी जादा विषयों की उपलब्धि इस कोष के द्वारा की गयी है ।

श्रीमहाराज के सारेग्रंथोंकी पृष्ठ संख्या केवल ६००० है ।

और उसका सूचि कोष ६०८ पृष्ठों का है ।

इसमे भी ४ खंडोंकी सूचि करने की बाकी है ।

मनोगत

ऐसमहत्वपूर्ण विषयसूचिकोष का कार्य वेद, पुराण, रामायण, महाभारत आदि अनेक शास्त्रीय संस्कृत ग्रंथों के बारे में हो सकता है । ऐसप्रयत्न किया जाय तों हमारे प्राचीन संस्कृति का, आधुनिक कालसे टुटा हुआ संबंध पुनः प्रस्थापित होने में बहुत योगदान मिलेगा। प्राचीन ग्रंथों के विषय-कोष निर्माण करने में यह नमुना मात्र हो सकता है ।

॥ श्रीज्ञानेश्वर माउली ॥

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज यांच्या सवाशे ग्रंथांत कोणता विषय कोणत्या पानावर
आला आहे याचा सूचिकोष
आमचे पिताश्री
कै. दत्तात्रेय गणपतराव खापरे यांनी
चाळीस वर्षे अध्ययन करून एकट्याने तयार केला आहे.
हा ग्रंथराज मोठ्या आकाराचा असून
७०० पृष्ठांचा आहे.
भाऊसाहेबजी यांनी प्रत्येक विषय निवडला
पूर्णसमजून घेतला आणि
सोपा करून एकेका वाक्याच्या संपुटीत लिहिला,
त्या समोर पृष्ठ-क्रमांक टाकला
आणि
श्रीगुलाबरावमहाराजांनी स्पर्श केलेल्या विषयांचा
सूचि-कोष म्हणजे माधुर्य-मधुकोषनिर्माण झाला.

*

यात साधारणपणे प्रत्येक विषयावर
१-२ पासून ४-५ शे पर्यंत
अशा ३०-४० हजाराहून अधिक एंट्रीज आहेत.
अशाप्रकारचा
**''शब्दार्थवाही कोष''**
जगात एकमेव आहे, असे जाणकारांचे मत आहे.

(या ग्रंथाचे मूल्य रु. ३००/-असून समारंभकालीन **सवलत मूल्य रु. २००/-** आहे)

# ग्रंथ-विमोचन समारंभ

***************************************

श्री भाऊसाहेब खापरे निर्मित ग्रंथराज

**॥ माधुर्य-मधुकोष ॥**

याचे प्रकाशन

रा.स्व.संघाचे सरसंघचालक

**परम पूजनीय सुदर्शनजी**

यांच्या शुभ हस्ते होत आहे.

*

या समारंभाला प्रमुख अतिथी व प्रमुख वक्ते म्हणून

कॉंग्रेस प्रचारप्रमुख महा.राज्य व महाराष्ट्रातील थोर विद्यावंत

**डॉ. श्रीकान्त जिचकार**

उपस्थित राहणार आहेत.

*

आपण सर्वांनी या शुभ समारंभाला उपस्थित राहून ज्ञानसत्राचा लाभ घ्यावा, ही विनंती !

*

यानंतर श्रीमहाराजांच्या पदांच्या गायनाचा कार्यक्रम होईल.

**गायक : डॉ. प्रकाश संगीत,** आकाशवाणी, मुंबई

*

*विनीत*

***खापरे-परिवार***

***दिनांक :*** *२५ एप्रिल २००३*

***वेळ*** *: सायंकाळी ६ वाजतां*

***स्थान*** *: सायंटिफिक सभागृह, आठ-रस्ता चौक, लक्ष्मीनगर, नागपूर*